रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक २८५
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ सोमवार, ४ मे २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

'एम्स'मध्ये देशातील पहिले पोर्टेबल एमआरआय मशीन/२
महिलेचा संशयास्पद मृतदेह आढळला/६
भारतीय नौदलाने बंड्या मारूती चषक पटकाविला/८

## महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन अध्यक्षपदी ना. मोहोळ



**पुणे** : महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन (एमओए)च्या अध्यक्षपदी एमओएचे वरिष्ठ उपाध्यक्ष आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. पुण्यात आयोजित एमओएच्या विशेष वार्षिक सर्वसाधारण सभेत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. असोसिएशनचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अपघाती निधन झाल्याने हे पद रिक्त झाले होते. या पदावर अध्यक्ष नेमणे आणि इतर विषयासाठी विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेमध्ये केंद्रीय राज्यमंत्री मोहोळ यांच्या नावाला सर्वानुमते सहमती मिळाली. ते महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष असून या संघटनेच्या माध्यमातून त्यांची महाराष्ट्र ऑलम्पिक असोसिएशनच्या वरिष्ठ उपाध्यक्षपदी निवड झाली होती. त्यांच्या नव्या निवडीमुळे राज्याच्या क्रीडा क्षेत्रात नवचैतन्य निर्माण झाले आहे.

# नसरापूर प्रकरणाचा तपास एसआयटीकडे

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील नसरापूर (ता. भोर) येथील बालिका अत्याचार व हत्या प्रकरणाचा तपास आता विशेष तपास पथक (एसआयटी) करणार आहे. या घटनेचा तपास करण्यासाठी राज्य सरकारकडून एसआयटी स्थापन करून तपासाला वेग दिला गेला आहे.

नसरापूर येथे १ मे रोजी एका ६५ वर्षीय व्यक्तीने घरासमोर खेळणाऱ्या चिमुकलीला गोठ्यात नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. नंतर दगडाने ठेचून तिला निर्घृणपणे संपवले आणि तिचा मृतदेह शेणाच्या ढिगाऱ्याखाली झाकून ठेवला. दुपारी चिमुकली न दिसल्याने तिची शोधाशोध केल्यानंतर ती गोठ्यात मृतावस्थेत आढळली. त्यानंतर परिसरातील सीसीटीव्ही फुटेज चेक केल्यानंतर आरोपी चिमुकलीला गोठ्याच्या दिशेने घेऊन जाताना दिसला. मग हा प्रकार उघडकीस आला.

आजीकडे उन्हाळ्याच्या सुट्टीसाठी आलेल्या चिमुकलीच्या कुटुंबीयांनी आपल्या मुलीसोबत असे कधी घडेल याचा विचारही केला नव्हता. नराधम आरोपीने वासरू दाखवतो म्हणून हात धरून त्या चिमुकलीला गोठ्यात नेले आणि तिच्यावर अत्याचार केला. या घटनेनंतर संताप व्यक्त होत असून आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.

नसरापूर घटनेप्रकरणी स्थापन करण्यात आलेल्या एसआयटीमध्ये सहा अधिकाऱ्यांचा समावेश आहे. त्यापैकी दोन महिला अधिकारी आहेत. पुणे ग्रामीण पोलिसांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा या एसआयटीमध्ये समावेश आहे.

## नराधमाला यमसदनी पाठवण्यासाठी सरकार कोणतीही कसर सोडणार नाही –मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**नागपूर : प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील नसरापूर (ता. भोर) येथील चिमुरडीवर अत्याचार करून तिचा निर्घृण खून करणाऱ्या नराधमाला यमसदनी पाठवण्यासाठी राज्य सरकार कोणतीही कसर सोडणार नाही. अशा गुन्हेगारांना भर चौकात फाशी दिली पाहिजे, अशी स्पष्ट भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी (दि.३) नागपूर येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना व्यक्त केली.

मुख्यमंत्री म्हणाले की, मी स्वतः पीडितेच्या वडिलांशी संवाद साधला आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये प्रचंड रोष आहे आणि तो रास्तच आहे. अशा नराधमांना कठोर शासन व्हावे हीच सरकारची भूमिका आहे. कोणालाही कायद्याचा दुरूपयोग करता येऊ नये किंवा तांत्रिक त्रुटीचा फायदा मिळू नये या दृष्टीने सरकार भक्कमपणे न्यायालयात बाजू मांडेल. आरोपीला फाशीची शिक्षा मिळवून देण्यासाठी या प्रकरणाचा खटला अत्यंत वेगाने



चालवला जाईल.

पीडित कुटुंबाच्या पाठीशी सरकार खंबीरपणे उभे असल्याचे सांगताना मुख्यमंत्री म्हणाले की, या प्रकरणाचा तपास आणि न्यायालयीन प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्यासंदर्भात प्रशासनाच्या वतीने पीडित कुटुंबाला एक लेखी पत्रही देण्यात आले आहे.

घटनेच्या ठिकाणी काही लोक परिस्थितीचा गैरफायदा घेऊन वेगळे वळण लावण्याचा प्रयत्न करीत होते, असा आरोप यावेळी मुख्यमंत्र्यांनी केला. ते म्हणाले, काही लोक पीडितेच्या वडिलांनाही अडवण्याचा प्रयत्न करीत होते, ते कोण आहेत हे आम्हाला समजले आहे, मात्र मुलीच्या वडिलांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून जी भूमिका घेतली त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

या प्रकरणातील आरोपीवर यापूर्वीही एक गुन्हा दाखल झाला होता, मात्र पुराव्याअभावी तो सुटला होता. यावर बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, त्यावेळी तपासात काही उणिवा राहिल्या होत्या का याची चौकशी केली जाईल तसेच त्याचे जुने गुन्हे शोधून काढून यावेळेस तो कोणत्याही परिस्थितीत सुटणार नाही याची खबरदारी घेतली जात आहे.

यावेळी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेस नेते व विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर टीका केली. काँग्रेसने आपल्या संख्याबळाच्या जोरावर महिला आरक्षणाला विरोध केला. त्यामुळे महिला आरक्षण विधेयकावर बोलण्याचा राहुल गांधींना कोणताही अधिकार नाही, असे मुख्यमंत्र्यांनी सुनावले.

## पाच राज्यांमधील विधानसभा निवडणुकीचा आज जाहीर होणार निकाल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशातील पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ, आसाम आणि पुद्दुचेरी या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीचा निकाल सोमवारी (दि.४) जाहीर होणार आहे. एप्रिल महिन्यात पार पडलेल्या या मतदानानंतर आता संपूर्ण देशाचे लक्ष या मतमोजणीकडे लागले आहे.

प्रादेशिक अस्मिता, विकास अशा विविध मुद्द्यांवर ही निवडणूक लढली गेली. सर्वाधिक लक्ष बंगालच्या निकालावर असेल. सोमवारी सकाळी ८ वाजेपासून मतमोजणीला सुरुवात होईल. दुपारी १२ वाजेपर्यंत बहुतांश राज्यांचे कल स्पष्ट होतील.

पश्चिम बंगालमध्ये सत्ता राखण्यासाठी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सर्वस्व पणाला लावले आहे. भाजपने येथे मुख्य विरोधी पक्ष म्हणून तगडे आव्हान दिले असून यावेळी ही लढत अधिक चुरशीची मानली जात आहे. दक्षिण भारतातील तामिळनाडूमध्ये यंदाही मुख्य लढत डीएमके आणि एआयएडीएमके यांच्यातच पहायला मिळाली. केरळमध्ये मुख्यमंत्री पिनराई विजयन यांना काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूडीएफने आव्हान दिले आहे. ईशान्य भारतातील आसाममध्ये एनसीआर आणि सीएए यांसारख्या मुद्द्यांवर निवडणूक लढली आहे, तर पुद्दुचेरी या केंद्रशासित प्रदेशातही स्थानिक विषय महत्त्वाचे ठरले आहेत.



### पोटनिवडणुकीचीही मतमोजणी

**मुंबई** : देशातील पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीबरोबरच सात ठिकाणच्या पोटनिवडणुकीचा निकालही सोमवारी (दि.४) घोषित केला जाणार आहे. यामध्ये महाराष्ट्रातील बारामती आणि राहुरी मतदारसंघांचा समावेश आहे. या पोटनिवडणुकीसाठी मतदान प्रक्रिया यापूर्वी पार पडली असून सोमवारी सकाळी ८ वाजल्यापासून मतमोजणीस सुरुवात होणार आहे. सुरुवातीच्या काही फेऱ्यांमध्येच कल स्पष्ट होण्याची अपेक्षा असून दुपारपर्यंत बहुतांश निकाल हाती येतील. महाराष्ट्रातील बारामती व राहुरीखेरिज गुजरातमधील उमरेठ, कर्नाटकातील बागलकोट व दावणगेरे दक्षिण नागालँडमधील कोरिडांग, तसेच त्रिपुरातील धर्मनगर या मतदारसंघांमध्ये पोटनिवडणूक झाली आहे. सर्व निकाल सोमवारी लागेल.

## राजधानी दिल्लीत अग्नितांडव! नऊ जणांचा होरपळून मृत्यू, चौघे गंभीर





**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राजधानी दिल्लीतील विवेक विहार भागात रविवारी (दि.३) पहाटे पावणेचारच्या सुमारास एका चार मजली निवासी इमारतीला भीषण आग लागली. या दुर्घटनेत नऊ जणांचा होरपळून मृत्यू झाला असून चार जण गंभीर जखमी झाले आहेत.

आग इतकी भीषण होती की काही वेळातच आगीने इमारतीचा दुसरा, तिसरा आणि चौथा मजला आपल्या कचाट्यात घेतला. गाढ झोपेत असलेल्या रहिवाशांना बाहेर पडण्याची संधी मिळाली नाही. अग्निशमन दलाच्या जवानांनी इमारतीतून सुमारे १० ते १५ जणांना सुखरूप बाहेर काढले, मात्र या घटनेत नऊ जणांचा या आगीत होरपळून मृत्यू झाला. जखमींवर उपचार सुरू असून मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

### एसी ब्लास्टमुळे दुर्घटना?

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही, मात्र प्रत्यक्षदर्शी आणि प्राथमिक अंदाजानुसार एसीचा स्फोट झाल्याने आग लागली असावी. अधिकाऱ्याने सांगितले की, एका खोलीला सेंट्रल लॉकिंग सिस्टिम होती. शॉर्टसर्किटमुळे लॉक जाम झाले. ऐन पहाटे घडलेल्या या दुर्घटनेने अनेक कुटुंबांचा आधार हिरावून घेतला असून दिल्लीत हळहळ व्यक्त केली जात आहे.

## निवडक

### चेन्नई विमानतळावर चालत्या विमानातून प्रवाशाने मारली उडी

**चेन्नई** : येथील आंतरराष्ट्रीय विमानतळावर रविवारी (दि.३) पहाटे शारजाहून चेन्नईला आलेल्या एअर अरेबिया कंपनीच्या विमानातून एका ३४ वर्षीय प्रवाशाने चक्क आपत्कालीन दरवाजा उघडून खाली उडी मारली. विमान धावपट्टीवरून टॅक्सीवेकडे संथ गतीने जात असताना हा प्रकार घडल्याने प्रवाशाला कोणतीही गंभीर इजा झाली नाही. दरम्यान, विमानात असताना त्याला मळमळत होते आणि त्याने दोनदा उलट्याही केल्या होत्या. याबाबत पोलीस अधिक तपास करीत आहेत.

### एमपीच्या क्रूझ दुर्घटनेतील मृतांचा आकडा १२वर

**भोपाळ** : मध्य प्रदेशातील जबलपूर जिल्ह्यात नर्मदा नदीवर बांधलेल्या बर्गी धरणात झालेल्या क्रूझ दुर्घटनेनंतर मदत व बचावकार्य सातत्याने सुरू आहे. दरम्यान, रविवारी (दि.३) सकाळी शोधमोहिमेदरम्यान रेस्क्यू टीमला एका मुलाचा मृतदेह सापडला. त्यामुळे या दुर्घटनेतील मृतांची संख्या वाढून १२ झाली आहे. अजून एक व्यक्ती बेपत्ता असून त्याचा शोध सुरू आहे.

## वेरूळ लेणी येथे मधमाशांच्या हल्ल्यात १०० पर्यटक जखमी



**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

वेरूळ लेणी परिसरात रविवारी (दि.३) एक धक्कादायक घटना घडली. सुट्ट्या असल्याने मोठ्या संख्येने पर्यटक लेणी पाहण्यासाठी आले असताना अचानक मधमाशांनी हल्ला केला. या घटनेत सुमारे १०० पर्यटक जखमी झाले असून एका महिला पर्यटकाची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे.

मे महिन्यातील सलग सुट्ट्यांमुळे राज्यासह इतर भागांतूनही हजारो पर्यटक वेरूळ लेणी पाहण्यासाठी आले होते. लेणी क्रमांक १६ (कैलास लेणी) आणि लेणी क्रमांक १० परिसरात मोठी गर्दी असतानाच अचानक मधमाशांचे पोळे हलले व त्यांनी पर्यटकांवर हल्ला केला.

अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे पर्यटकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आणि स्वतःचा बचाव करण्यासाठी सर्वत्र धावपळ उडाली. या हल्ल्यात अनेकांना मधमाशांनी चावे घेतले. जखमींपैकी एका महिलेला मोठ्या प्रमाणात दंश झाल्याने तिची प्रकृती चिंताजनक असून तिला तातडीने शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## थोर समाजसुधारक स्व. जनार्दन भगत यांच्या पुण्यतिथीनिमित्त सामाजिक कार्यक्रम; आज उलवे नोडमध्ये नियोजन आढावा बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

थोर समाजसुधारक स्व. जनार्दन भगत यांच्या ३८व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाची नियोजन आढावा बैठक सोमवारी (दि. ४) आयोजित करण्यात आली आहे. ही बैठक सायंकाळी ६ वाजता उलवे



नोड सेक्टर १२मधील रामशेठ ठाकूर मैदान येथे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

स्व. जनार्दन भगत यांच्या पुण्यतिथीनिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाची तयारी अंतिम टप्प्यात आली असून त्याची आढावा बैठक होणार आहे.

संबंधितांनी या बैठकीस उपस्थित राहावे, असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी केले आहे.



**खारघर** : येथील श्री राघवेंद्र स्वामी मठातील मंदिरास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी रविवारी भेट देत दर्शन घेतले. सोबत भाजप शहर मंडळ अध्यक्ष नगरसेवक प्रवीण पाटील तसेच विश्वस्त मंडळी.

## रायगडचे किनारे पर्यटकांनी हाऊसफुल्ल!

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र दिनाची सुट्टी, त्याला जोडून आलेला शनिवार-रविवार असा सलग तीन दिवसांचा सुट्टीचा योग तसेच शाळांच्या परीक्षा संपून लागलेल्या सुट्ट्या या दुहेरी संधीमुळे रायगड जिल्ह्यातील समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांची गर्दी झाल्याचे पाहावयास मिळाले.

अलिबाग, किहीम, आवास, सासवणे, वरसोली, नागाव, चौल, रेवदंडा, काशीद, मुरूड, श्रीवर्धन, दिवेआगर आणि हरिहरेश्वर या किनाऱ्यांवर हजारो पर्यटक दाखल झाले असून सर्वत्र उत्साहाचे वातावरण आहे. मुंबई, ठाणे, नवी मुंबई आणि पुण्यासह राज्याच्या विविध भागांतून पर्यटक मोठ्या संख्येने रायगडकडे वळले.

उन्हाचा कडाका वाढला असला तरी समुद्राच्या थंडगार पाण्यात डुंबत पर्यटकांनी उकाड्यावर मात करण्याचा आनंद घेतला. विशेषतः लहान मुलांचा उत्साह ओसंडून वाहताना दिसत होता. समुद्रस्नानासोबतच एटीव्ही राईड्स, बोटिंग, सागरी सफर, घोडेस्वारी आणि उंट सफारी यांचा पर्यटकांनी मनसोक्त आस्वाद घेतला.

पर्यटकांची संख्या वाढल्याने हॉटेल्स, रिसॉर्ट्स आणि लॉजेस फुल्ल झाल्याचे चित्र दिसून आले. स्थानिक पर्यटन व्यावसायिकांसाठी ही गर्दी 'सुगीचे दिवस' ठरत असून पर्यटन हंगाम अशा सलग सुट्ट्यांमुळे अधिकच बहरला आहे.

एकूणच सुट्ट्यांचा फायदा घेत कुटुंबासह बाहेर पडण्याची क्रेझ वाढत असल्याचे चित्र असून रायगड जिल्ह्यातील समुद्रकिनारे पुन्हा एकदा पर्यटकांच्या गर्दीने गजबजल्याचे दिसून आले.



## राज्यात अवकाळी पावसाचा अंदाज

**पुणे : प्रतिनिधी**

एप्रिलपाठोपाठ मे महिन्याच्या सुरुवातीलाही उष्णतेच्या लाटेने सगळ्यांचा घाम काढला, पण ४ ते ७ मेदरम्यान अंगाची लाही लाही करणाऱ्या उकाड्यातून सुटका होऊ शकते. हवामान विभागाने राज्यातील काही भागांमध्ये मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवला आहे.

विशेषतः विदर्भ, मराठवाडा आणि कोकणात वेगवान वारे, विजांच्या कडकडाटासह पाऊस होणार असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे. या दृष्टीने यलो अलर्ट देण्यात आला आहे.

## मिसिंग लिंकमुळे बोरघाटाने घेतला मोकळा श्वास!

**खालापूर : प्रतिनिधी**

सलग सुट्ट्या आणि सणासुदीचे दिवस असले की मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर बोरघाटात वाहतूक कोंडी होत असे. त्यामध्ये अपघात घडला तर अनेक तास प्रवासी अडकून राहत असत, परंतु मिसिंग लिंक सुरू झाल्याने हे चित्र बदलले आहे.

वीकेण्डला वाहनांनी गजबजणारा बोरघाट रविवारी (दि.३) सुना सुना दिसून आला. मुंबई तसेच पुण्याहून मुंबईच्या दिशेने जाणारी प्रवासी वाहने व एसटी बसेस मिसिंग लिंकमार्गे गेल्याने बोरघाट वाहतूक



कोंडीमुक्त होता. अमृतांजन पूल ते आडोशी बोगदा खोपोली बायपास मार्गावर शनिवार, रविवार सुट्यांमध्ये पाच ते सहा किमी वाहनांच्या रांगा असायच्या. त्याच क्षेत्रात आता तुरळक वाहनांची वर्दळ होती.

महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) सहा हजार ७०० कोटी रुपये खर्चून खोपोली बायपास ते सिंहगड कॉलेज लोणावळा असा समांतर भुयारी मार्ग जमिनीखालून बांधला. यामध्ये दोन बोगदे व दोन पूल यांचा समावेश आहे. या मिसिंग लिंकमुळे बोरघाटातील वाहतूक कोंडी अखेर फुटली असून वाहतूक पोलिसांनीही सुटकेचा निःश्वास टाकला आहे.

# ‘एम्स’मध्ये देशातील पहिले पोर्टेबल एमआरआय मशीन झाले कार्यरत

**मुंबई : प्रतिनिधी**

देशातील आरोग्यसेवेत महत्त्वाचा टप्पा गाठत ऑल इंडिया इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायनन्सेस (एम्स) येथे भारतातील पहिले पोर्टेबल एमआरआय मशीन सुरू करण्यात आले आहे. या अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे आता गंभीर रुग्णांची मेंदू तपासणी थेट त्यांच्या बेडशेजारीच करता येणार असून, उपचार प्रक्रियेत मोठी सुलभता आणि वेग येण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सामान्यतः एमआरआय स्कॅनसाठी रुग्णाला विशेष कक्षात हलवावे लागते. विशेषतः आयसीयू मध्ये दाखल असलेल्या किंवा व्हेंटिलेटरवर असलेल्या रुग्णांना हलवणे धोकादायक ठरू शकते. अशा परिस्थितीत नव्याने सुरू करण्यात आलेले पोर्टेबल एमआरआय मशीन मोठा दिलासा देणारे ठरत आहे.

हे उपकरण थेट रुग्णाच्या बेडपर्यंत नेऊन तपासणी करता येते, ज्यामुळे



## रुग्णाच्या बेडशेजारीच मेंदू तपासणी शक्य

रुग्ण हलवण्याची गरजच राहत नाही.

तज्ञांच्या मते हे मशीन ‘अल्ट्रा-लो-फील्ड’ एमआरआय तंत्रज्ञानावर आधारित आहे. पारंपरिक एमआरआय मशीनच्या तुलनेत याची क्षमता काही प्रमाणात कमी असली तरी ते जलद, सुरक्षित आणि वापरण्यास सोपे आहे. विशेषतः स्ट्रोक, मेंदूवरील दुखापत, न्यूरोलॉजिकल आजार आणि स्त्रक्रियेनंतरच्या रुग्णांच्या स्थितीचे तात्काळ मूल्यांकन करण्यासाठी हे अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

एम्समधील डॉक्टरांनी सांगितले की, या उपकरणामुळे आपत्कालीन परिस्थितीत निर्णय घेण्याचा वेळ मोठ्या प्रमाणात कमी होईल. रुग्णाच्या स्थितीचे त्वरित चित्र मिळाल्यामुळे डॉक्टरांना उपचाराची दिशा लगेच ठरवता येईल. विशेषतः मेंदूविकारांमध्ये वेळेचे महत्त्व लक्षात घेता, हे तंत्रज्ञान जीव वाचवण्यातही महत्त्वाची भूमिका बजावू शकते.

याशिवाय हे मशीन बालरुग्णांसाठीही फायदेशीर ठरणार आहे. लहान मुलांना एमआरआयसाठी हलवताना किंवा त्यांना स्थिर ठेवताना येणाऱ्या अडचणी टाळता येणार आहेत. त्यामुळे बालरुग्णांच्या तपासणी प्रक्रियेतही सुधारणा होणार आहे. तथापि, तज्ञांनी स्पष्ट केले आहे की हे पोर्टेबल एमआरआय मशीन पारंपरिक एमआरआयची पूर्णतः जागा घेणार नाही. सखोल आणि तपशीलवार तपासणीसाठी मोठ्या एमआरआय मशीनची गरज कायम राहणार आहे. मात्र, आपत्कालीन आणि गंभीर परिस्थितीत हे उपकरण एक प्रभावी पूरक साधन म्हणून काम करेल.

# दिवसाच्या वीजवापरात ७० लाख ग्राहकांना २२३५ कोटींचा लाभ

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील वीज ग्राहकांना सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीतील वीजवापरासाठी टीओडी (टाइम ऑफ डे) सवलत जुलै २०२५ मध्ये लागू केल्यापासून आतापर्यंत ७० लाख ग्राहकांना एकूण २२३५ कोटी रुपयांचा लाभ झाला असून त्यामध्ये १५,९०७ उच्चदाब औद्योगिक ग्राहक एकूण १५३४ कोटी रुपयांच्या लाभासह प्रथम स्थानावर आहेत, अशी माहिती महावितरणतर्फे देण्यात आली. विजेचा वापर कोणत्या वेळेत झाला त्याच्या आधारे वीजदरात सवलत दिली जाते त्याला टीओडी सवलत म्हणतात. राज्यात जुलै २०२५ पासून १० किलोवॅटपेक्षा जास्त भार असलेल्या औद्योगिक व वाणिज्यिक वीज ग्राहकांना सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीतील वीज वापरासाठी सवलत देण्यात आली. या ग्राहकांना एप्रिल ते सप्टेंबर या महिन्यांसाठी १५ टक्के तर ऑक्टोबर ते मार्च या महिन्यांसाठी २५ टक्के इतकी मोठी सवलत देण्यात येत आहे. सर्व घरगुती ग्राहकांनाही प्रथमच टीओडी सवलतीचा लाभ देण्यास सुरुवात झाली असून चालू आर्थिक वर्षात सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीतील वीजवापरासाठी प्रती युनिट ८५ पैसे सवलत देण्यात येते. स्मार्ट मीटरमध्ये कोणत्या वेळी किती वीजवापर झाला हे मोजण्याची सुविधा असल्याने स्मार्ट मीटर बसविलेल्या घरगुती ग्राहकांना या सुविधेचा लाभ होत आहे. औद्योगिक ग्राहकांमध्ये उच्च दाब औद्योगिक ग्राहक, उच्चदाब हंगामी औद्योगिक ग्राहक, लघुदाब औद्योगिक ग्राहक आणि यंत्रमाग असा एकत्रित विचार केला तर ४३,९११ औद्योगिक ग्राहकांना एकूण १,७७४ कोटी रुपयांचा लाभ झाला आहे. राज्यातील उच्चदाब व लघुदाब अशा ११,०१७ वाणिज्यिक ग्राहकांना एकूण २३९ कोटी रुपयांचा लाभ झाला आहे. घरगुती ग्राहकांना टीओडीचा लाभ मिळण्यास सुरुवात झाल्यापासून त्यांना १,०९६ दशलक्ष युनिट इतक्या विजेसाठी ८९ कोटी रुपयांचा लाभ झाला आहे. या कालावधीतील लाभधारक घरगुती ग्राहकांची संख्या ६९,३५,३८८ इतकी होती. राज्यात घरोघरी स्मार्ट मीटर बसविण्याच्या मोहिमेने वेग घेतला आहे. त्यासोबत टीओडी लाभ मिळणाऱ्या घरगुती वीज ग्राहकांची संख्याही वाढत आहे. सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीतील वीजदरातील सवलतीचा लाभ सार्वजनिक पाणीपुरवठा आणि अन्य सार्वजनिक सेवांसाठीही झाला आहे. या घटकांसाठी संबंधित १२,९८९ ग्राहकांना २०२ कोटी रुपयांचा टीओडी लाभ झाला. ही वीज स्वस्त मिळत असल्याने महावितरणने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या आदेशानुसार दिवसाच्या वीजवापरासाठी सवलत लागू केली आहे.

# अलिबागमध्ये सहाण बायपासजवळ अपघात; सहा जण जखमी

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील सहाण बायपास परिसरात रविवारी ( दि. ३) दुपारी मिनीडोर आणि इको कार यांच्यात समोरासमोर धडक झाल्याने झालेल्या अपघाता सहा जण जखमी झाले. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही.



रामराज ग्रामपंचायतीचे माजी सरपंच हिराजी काष्टे यांच्या मालकीची इको कार (एमएच ०६ सीएल ०४१४) या वाहनात सहा प्रवासी प्रवास करत होते.

अपघातात सुरेश लागे या प्रवाशाच्या पायाला गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. इतर प्रवाशांनाही किरकोळ मार लागल्याची माहिती मिळाली आहे.

दुसरीकडे, खानाव येथील संतोष मगर यांच्या मिनीडोर (एम एच - ०६ - एस - ३००१) या वाहनात पाच प्रवासी होते. या वाहनातील प्रवाशांना कोणतीही दुखापत झाली नाही. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली व जखमींना तातडीने वैद्यकीय मदत पुरवण्यात आली.

# महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडून चार कोटींचा निधी उपलब्ध; आमदार मंदा म्हात्रे यांच्या पाठपुराव्याला यश

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईमधील बेलापूर गावातील व इतर परिसरातील नागरिक सेक्टर १५, बेलापूर ब्रिज खाली दशविधी क्रिया करण्याकरिता येत असतात. परंतु सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारची सुखसुविधा नसल्याने धार्मिक कार्यक्रम करण्याकरिता नागरिकांची गैरसोय होत होती. तसेच आमदार मंदाताई म्हात्रे यांनी सदर गैरसोय पाहता सेक्टर १५ येथे ब्रिजखाली दशक्रिया विधी व विविध विकास कामे करण्याकरिता महाराष्ट्र मेरी टाईम बोर्डाकडून रु. ४ कोटी निधी उपलब्ध करून सदर परिसराचा



विकास करण्यात आला आणि त्या विकास कामांचा आज लोकार्पण बेलापूर स्थानिक नागरिकांच्या उपस्थितीत मोठ्या उत्सहात संपन्न झाला. तसेच खरा नेता तोच जो केवळ रस्ते व इमारत उभारत नाही तर समाजात माणुसकीची पायाभरणी करतो. मानसान माणूस म्हणून जगलं पाहिजे हा संदेश केवळ शब्दात नाही तर कृतीत उतरविणाऱ्या नेतृत्वाची ओळख म्हणजे आमदार मंदाताई म्हात्रे. नवी मुंबईच्या विकासा बरोबरच धार्मिक विधी कार्य करण्याची सुविधा देखील उपलब्ध व्हावी याकरिता आमदार मंदा म्हात्रे यांच्या अथक प्रयत्नाने व महाराष्ट्र सागरी मंडळ, मुंबई यांच्या माध्यमातून बेलापूर सेक्टर १५ येथील ब्रिजखाली उभारण्यात आलेल्या विविध विकास कामांचा लोकार्पण सोहळा उत्साहात पार पडला. या अंतर्गत दशक्रिया विधींसाठी स्वतंत्र व्यवस्था, गणेश विसर्जन घाटे सुशोभीकरण करण्यात आले आहे.

## पोलीस महासंचालक पदकाने हवालदार सचिन पवार सन्मानित

**कळंबोली : बातमीदार**

महाराष्ट्र पोलीस दलातील अत्यंत मानाचे समजले जाणारे सर्वोच्च पोलीस महासंचालक पदक (डीजी मेडल) उत्कृष्ट व उल्लेखनीय सेवेसाठी पोलीस हवालदार सचिन सदाशिव पवार यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले.

माननीय अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, प्रवीण साळुंके यांच्या शुभहस्ते महामार्ग पोलीस केंद्र पळस्पे येथे आयोजित विशेष कार्यक्रमात पो.हवा. सचिन सदाशिव पवार यांचा पदक, पुष्पगुच्छ व सत्कार करून गौरव करण्यात आला.

पोलीस सेवेत कर्तव्यदक्षता, प्रामाणिकपणा, शिस्तबद्ध कार्यपद्धती तसेच जनतेच्या सुरक्षेसाठी दिलेल्या उत्कृष्ट



योगदानाची दखल घेत त्यांना हा प्रतिष्ठेचा सन्मान देण्यात आला. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे पोलीस दलासह परिसरात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या सन्मानाबद्दल विविध स्तरांतून पो.हवा. सचिन सदाशिव पवार यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहेत.

# खारपाटील कनिष्ठ महाविद्यालयाचा बारावीचा निकाल ९८.७१ टक्के

**उरण : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा बारावीचा निकाल जाहीर झाला. पी. पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या राजेंद्र परशुराम खारपाटील कनिष्ठ महाविद्यालयातील बारावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून, यात बारावी विज्ञान शाखेचा शेकडा निकाल ९८.७१ टक्के लागला असून, स्मित पाटील (६५ टक्के) गुण मिळवून, महाविद्यालयात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला. तर अदिती पाटील (६१.८३ टक्के) गुण मिळवून द्वितीय आली. आशिष फुंडेकर (६१टक्के) गुण मिळवून तृतीय आला. संस्कृती भगतने ७०.६७ टक्के गुण मिळवून प्रथम आली. हरेश पाटीलने ६३.३३% गुण मिळवून द्वितीय आला. ऋषभ पाटील ६० टक्के गुण मिळवून तृतीय आला.

कला शाखेचा शेकडा निकाल ८४.०९ इतका लागला असून दीक्षिता जिचंद भगत हिने ७२.६७ टक्के गुण मिळवून प्रथम आली. मानसी ठाकूरने ५८.५०% टक्के मिळवून द्वितीय आली. हर्षाली पाटीलने ५८.३३ टक्के गुण मिळवून तिसरी आली. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थापक अध्यक्ष पांडुरंग खारपाटील, उपाध्यक्ष राजेंद्र खारपाटील सागर खारपाटील, समीर खारपाटील, अर्चना ठाकूर, वर्षा खारपाटील, सुनिता खारपाटील, व्ही ए पाटील, मिलिंद पट्टेबहादूर, आनंद चिर्लेकर, रेखा धराडे, मंथना ठाकूर, सुप्रिया पाटील, मंदा घरत, स्मिता मसुरकर तसेच महाविद्यालयाच्या शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी अभिनंदन केले.



# वाशिवली कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.आर.पाटील सेवानिवृत्त

**मोहोपाडा : प्रतिनिधी, वार्ताहर**

महाराष्ट्र शासनाचा जिल्हा व राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक डॉ.अनिल हिराई रामराव पाटील यांचा जीवन कला मंडळ रसायनी व डॉ.पारनेरकर महाराज विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालया तर्फे सेवानिवृत्ती सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. आपल्या ३० वर्षाच्या प्रदिर्घ सेवेत त्यांनी आदिवासी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून आपल्या संस्थेचा व शाळेचा परिसरात नावलौकिक निर्माण केला. जीवन कला मंडळ रसायनी या संस्थेने दखल घेऊन सन २०१३ पासून



त्यांची मंडळावर कोषाध्यक्ष म्हणून नियुक्ती केली. या संधीचे सोने करून त्यांनी अध्यापनाबरोबर संस्थेच्या माध्यमातून परिसरातील एस.एच.केळकर, बिर्ला कार्बन, अल्केल अमाईनस व नोहोझाईम कंपनीच्या सामाजिक विकास अधिकारी यांच्याशी संपर्क साधून आपल्या शाळेत वर्ग खोल्या,प्रयोगशाळा बांधकाम संगणक लॅब व भौतिकसुविधा तयार केल्या. या सोहळ्याला जीवन कला मंडळ रसायनी अध्यक्ष तुलसीदास पाटील, सचिव अनंता दळवी, सहसचिव मोहन मालकर, पाटील सरांचे मोठे बंधू बाळासाहेब पाटील, डॉ.भाउसाहेब पाटील, व्याही जैनेंद्र बोरसे, भानुदास बोरसे, प्रारब्ध पवार,युवराज सुर्यवंशी, प्रा.गणेश सोनवणे, माजी मुख्याध्यापक काळे सर व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

जीवन कला मंडळ रसायनीचे कार्याध्यक्ष प्रज्ञावंत आ.लक्ष्मीकांत पारनेरकर यांनी पाटील सर यांना शुभेच्छा संदेश दिला.

# श्रीवर्धन शहराजवळील पंपांवर पेट्रोल नसल्याने वाहनचालकांची गैरसोय




**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

२ मे रोजी सायंकाळी श्रीवर्धन शहराजवळ असलेल्या तिन्हीही पेट्रोल पंपा मधील पेट्रोल संपल्याचे बोर्ड लावण्यात आले होते. एक तारखेला महाराष्ट्र दिन व कामगार दिनाची सर्वत्र सुट्टी असल्यामुळे व दुसऱ्या दिवशी शनिवार, रविवार अशी दोन दिवस सलग सुट्टी असल्याने श्रीवर्धन शहरामध्ये पर्यटक मोठ्या प्रमाणावर आले होते. संपूर्ण श्रीवर्धन शहरामध्ये पर्यटकांच्या वाहनांच्या रांगाच रांगा लागल्याचे पाहायला मिळत होते. त्याचप्रमाणे नेहमीप्रमाणे शहरामध्ये सर्वत्र वाहतूक कोंडी झालेलीही पाहायला मिळत होती.

यातील दोन पेट्रोल पंप आराठी ग्रामपंचायत हद्दीमध्ये येतात तर एक पेट्रोल पंप भोस्ते ग्रामपंचायत हद्दीमध्ये येतो. यापैकी आज दुपारनंतर पाहणी केली असता श्रीवर्धन मेटकर्णी येथील भारत पेट्रोलियमच्या पंपावरती पेट्रोल व डिझेल विक्री सुरू असल्याचे पाहायला मिळाले. तसेच भोस्ते ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या पतंगे ऑटोमोबाईल्स या नयारा कंपनीच्या पेट्रोल पंपामध्ये देखील इंधन भरत असलेल्या गाड्या पाहायला मिळाल्या. परंतु आराठी गावाच्या हद्दीत असलेल्या सबीना ऑटोमोबाईल्स या पेट्रोल पंपावरती अद्यापही इंधन उपलब्ध नसल्याने पेट्रोल पंपामध्ये प्रवेश करणारा रस्ता व बाहेर पडणारा रस्ता बॅरिगेट्स लावून बंद करण्यात आला होता. काल सायंकाळी पेट्रोल संपल्याची बातमी गावात वाऱ्यासारखी पसरल्यानंतर सगळ्यांनीच भुवया उंचावल्या.

# पोटाची खळगी भरण्यासाठी मेंढपाळांची शेकडो किमीची पायपीट; आता लागले परतीचे वेध!

**पाली : प्रतिनिधी**

राज्यातील दुष्काळी व निमदुष्काळी भागातील मेंढपाळ, विशेषतः धनगर समाज, पोटाची खळगी भरण्यासाठी दरवर्षी आपला कुटुंबकबिला आणि शेळ्या-मेंढ्यांसह शेकडो किलोमीटरचा प्रवास करून कोकणात, विशेषतः रायगड जिल्ह्यात दाखल होतो. मात्र, रणरणता उष्मा, पाण्याची टंचाई आणि अवकाळी पावसाचा फटका यामुळे या मेंढपाळांची मोठी वाताहत होते. आता पावसाळा जवळ येत असल्याने या मेंढपाळांना आपल्या मूळ गावी परतण्याचे वेध लागले असून, त्यांचा परतीचा प्रवास सुरू झाला आहे.पाली सुधागड व जिल्ह्यातील अनेक भागात मेंढपाळ स्थिरावले होते.



हे मेंढपाळ घोडे किंवा खच्चरावर आपला लवाजमा, राखणदार कुत्रा आणि मेंढ्या घेऊन रायगडच्या माळरानावर दाखल होतात. कडक उन्हात उघड्यावर कापडी तंबू ठोकून त्यांचा संसार थाटला जातो. रायगडमध्ये पावसाळी भातशेती कापल्यानंतर जमीन पडीक असते, अशा जागी हे मेंढपाळ मुक्काम करतात. या बदल्यात मेंढ्यांच्या लेंडीपासून जमिनीला नैसर्गिक खत मिळत असल्याने शेतकरीही त्यांना आनंदाने जागा देतात. मात्र, हा प्रवास दिसतो तितका सोपा नाही. ऊन, वारा आणि पावसाची तमा न बाळगता दिवस-रात्र मेंढ्यांच्या कळपात राहून त्यांना हा व्यवसाय करावा लागतो.



### शहरीकरणाचा फास

***जिल्ह्यात वाढत चाललेले औद्योगीकरण आणि शहरीकरण यामुळे कृषी क्षेत्र आणि गायरान जमिनी कमी होत आहेत. परिणामी, मेंढपाळांना चारा आणि पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. जागाच उरली नाही तर मेंढ्या चरायच्या कुठे? असा प्रश्न आता या मेंढपाळांसमोर उभा ठाकला आहे.***

सततच्या स्थलांतरामुळे मेंढपाळांच्या मुलांना शाळा गाठता येत नाही. एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात भटकंती होत असल्याने या मुलांचे 'ज्ञानकण' गिरवण्याचे वय मेंढ्या राखण्यातच जाते. रणरणत्या उन्हात भटकंती करताना शुद्ध पाणी आणि सकस अन्न मिळत नाही. स्थानिक सरकारी दवाखान्यांवरच त्यांना अवलंबून राहावे लागते. दूरवर असल्याने मदतीला नातेवाईकही धावून येऊ शकत नाहीत. हा व्यवसाय पारंपरिक पद्धतीने चालतो.

# साखरपुड्यासाठी जाणाऱ्या बसचा अपघात; १० जण जखमी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील शिरढोण येथे रविवारी एका साखरपुड्याच्या कार्यक्रमासाठी जाणाऱ्या बसचा अपघात झाल्याची घटना घडली आहे. प्रवाशांनी भरलेली ही बस अचानक रस्त्यावर पलटी झाल्याने बसमधील प्रवासी जखमी झाले आहेत. हे सर्व प्रवासी टिटवाळा येथून माणगाव बाजूला एका साखरपुड्याच्या समारंभासाठी निघाले होते.



शिरढोण परिसरात साई कृपा हॉटेलसमोर ही बस पलटी झाली. अपघातानंतर परिसरात एकच खळबळ उडाली आणि स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतीसाठी धाव घेतली. जखमी प्रवाशांना तत्काळ उपचारासाठी हलवण्यात आले असून त्यापैकी काही जणांना पनवेलमधील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तर इतर प्रवाशांना कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

यामध्ये एक प्रवासी गंभीर जखमी आहे. सध्या पोलीस या अपघाताचा अधिक तपास करीत आहेत. साखरपुड्याला जाणाऱ्या बसचा अपघात होऊन बस पलटी झाल्याची घटना पनवेल तालुक्यातील शिरढोणजवळ घडली. या अपघातात तिघेजण गंभीर जखमी झाले असून १० जण किरकोळ जखमी झाल्याची माहिती पनवेल शहर पोलिसांनी दिली.

शहाड येथून बस माणगावच्या बाजूला साखरपुड्याच्या समारंभासाठी रविवारी सकाळी जात होते. दरम्यान याचवेळी शिरढोणजवळील एका हॉटेलजवळ एरटिगा गाडी बाहेर निघत असताना बसवरील चालकाला आपली बस नियंत्रित झाली नाही आणि बस डिव्हायडरला धडकली आणि पलटी झाली. या अपघातात एक जण गंभीर जखमी झाला, तर दोन जणांना फ्रॅक्चर झाले आहे.

# पनवेल महापालिकेच्या अभिनय प्रशिक्षण शिबिरास उत्साही प्रतिसाद

## खारघर आणि पनवेलसाठी वरिष्ठ बॅच फुल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ११ मेपासून नऊ दिवसांच्या अभिनय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. त्यास कलावंतांनी उत्साही प्रतिसाद दिला असून पनवेल व खारघर येथील वरिष्ठ बॅच फुल झाली असून इतर बॅचच्या काही मोजक्याच जागा शिल्लक आहेत. पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात नाट्यसंस्कृती चळवळीस चालना मिळावी, कलावंतांना मोठे व्यासपीठ मिळावे व सांस्कृतिक उपक्रम वाढावेत याकरिता महापौर नितीन पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार खारघर, कळंबोली व पनवेल येथे अभिनय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यात कळंबोली येथे शिक्षक-प्राध्यापक कलावंतांसाठी विशेष बॅचचे नियोजन करण्यात आले आहे.

युवा गटासाठी सकाळी ९ ते १२ व प्रौढ गटासाठी दुपारी २ ते ५ अशा वेळा असतील. शाळांमधील मुलांना अभिनय नाट्यविषयक प्रशिक्षण आवश्यक आहे. त्याकरिता संबंधित शाळेतील शिक्षकांना अधिक प्रशिक्षित केले तर त्याचा उपयोग होऊ शकतो. पनवेल, कळंबोली व खारघर येथे कलावंतांसाठी हे शिबिर मोफत आहे. पहिला गट विभाग म्हणजे वय वर्षे ८ ते १६ हा युवा गट व प्रौढ गट म्हणजे १७ ते ६५ वयापर्यंतच्या कलावंतांना यात सहभाग घेता येईल. हे शिबिर मोफत आहे. संख्या मर्यादेमुळे प्रथम येणाऱ्या ३०-३० नाट्यकर्मींनाच या शिबिरासाठी प्रवेश दिला जाईल. या शिबिरासाठी आपली नाव नोंदणी दिनांक ७ मेपर्यंत करावी, असे आवाहन पनवेल महानगरपालिका व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा पनवेल यांच्या वतीने करण्यात येत आहे. शिबिरात सहभागी होण्यासाठी संबंधितांनी पुढील क्रमांकावर संपर्क करावा: १.शामनाथ पुंडे- मो.नं : ९८२१७५८१४७ २. गणेश जगताप मो.नं.९८७०११६९६४ ३..श्रीमती स्मिता गांधी मो.नं. ९३२३४८९६९३ ४. सौ. वर्षा कुलकर्णी मो.नं. ७७१ ८१५१२७ ५. डॉ. राजू पाटोदकर मो.नं. ९८९२१०८३६५.

# पनवेल तालुका पत्रकार विकास मंचच्या काश्मीर दौऱ्याची सांगता

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील सक्रिय पत्रकारांची नोंदणीकृत संस्था असलेल्या पनवेल तालुका पत्रकार विकास मंचच्या ११ सदस्यांनी काश्मीरचा दौरा यशस्वीपणे पूर्ण केला.



या दौऱ्यात स्थानिक व्यावसायिक, पर्यटनस्थळे तसेच राजकीय व्यक्तिमत्त्वांच्या गाठीभेटी घेत सदस्यांनी विविध क्षेत्रांतील नाविन्यपूर्ण गोष्टींचे अध्ययन केले. २६ एप्रिल रोजी सुरू झालेल्या दौऱ्याची महाराष्ट्रदिनी म्हणजेच १ मे रोजी सांगता झाली. अध्यक्ष राजेंद्र पाटील यांच्या नेतृत्वात झालेल्या दौऱ्याचे संपूर्ण नियोजन सल्लागार विवेक पाटील, संजय कदम आणि मंदार दोंदे यांनी केले होते. विशेष म्हणजे मंचातील सदस्यांनी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून थेट श्रीनगर फ्लाईटने उड्डाण केले तसेच थेट श्रीनगरहून याच विमानतळावर लँडिंगचा अनुभव घेतला. बहुतांश सदस्यांनी प्रथमच नवी मुंबई विमानतळाचे अंतरंग एन्जॉय केले.

या दौऱ्यात मंचातील सदस्यांनी श्रीनगरमध्ये शालीमार उद्यान, निशात उद्यान, दाचीगाम नॅशनल पार्क, चष्मेशाही उद्यान, शंकराचार्य हिल मंदिर, शिकारा मार्केटिंग, हाउस बोट स्टे यांचा आनंद लुटला. पेहेलगाम येथे आरु वॅली, बेताब वॅली, ग्रीन वॅली, लिडार रिव्हर पॉईंट, हॉर्स रायडिंग यांचा मनमुराद आनंद मंचातील सदस्यांनी लुटला. श्रीनगर पेहेलगाम प्रवासात केसराच्या शेतजमिनी आणि क्रिकेट बॅट फॅक्टरी एक्सप्लोर करण्यात आले. अवंतीपुरा येथील विष्णू मंदिर भग्न अवशेष स्थानाला भेट देऊन त्याच्या इतिहासाचे अध्ययन सदस्यांनी केले. काश्मीर दौऱ्यातील सौंदर्याचे गंडस्थळ म्हणजे गुलमर्ग येथील गोंडोला राईड, शुभ्र बर्फाची चादर आणि हिमवर्षाव यांचा अवर्णनीय आनंद मंचातील सदस्यांनी अनुभवला. तब्बल १४ हजार फूट उंचीवरील सेकंड फेजवर हिमवर्षाव अनुभवत असताना अचानक हिमवादळ आले. भारतीय सेनेने तातडीने परिस्थितीचा ताबा घेत सर्व पर्यटकांना सुरक्षितरित्या रोपवेच्या साहाय्याने खाली उतरवले. स्थानिक व्यंजनांचा आस्वाद सगळ्यांनी लुटला.

उपाध्यक्ष दीपक घोसाळकर, सरचिटणीस हरेश साठे, खजिनदार दत्ता कुलकर्णी, प्रवीण मोहेकर, निलेश सोनावणे, लालचंद यादव, राजू गाडे यांनीही काश्मीर दौऱ्यात सहभाग नोंदवला.



खारघर : भोर येथील शांताराम चव्हाण यांची कन्या मनश्री आणि मोहोळ येथील विठ्ठलराव कांबळे यांचे पुत्र आदित्य यांचा विवाह रविवारी खारघर येथील श्री राघवेंद्र स्वामी मठ, बँक्वेट हॉल येथे झाला. या मंगलप्रसंगी राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून वधूवरांना शुभाशीर्वाद दिले. विवाह सोहळ्याला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत, मंत्री मंगलप्रभात लोढा, आशिष शेलार, नितेश राणे, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी आमदार संदीप नाईक यांच्यासह इतर मान्यवरांनी उपस्थिती लावून नवदाम्पत्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल उलवे शाळेत दिनांक १ मे २०२६ रोजी 'महाराष्ट्र दिन' आणि 'आंतरराष्ट्रीय कामगार' दिन अत्यंत उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी शाळेचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ८:३० वा. शाळा प्रांगणात झाली.





कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर (चेअरमन जे.बी.एस.पी.संस्था,पनवेल), जे.एम.म्हात्रे, अ‍ॅड. राहुल घरत, श्रीकांत घरत, वसंत पाटील, अनंत ठाकूर, विजय घरत, अजय भगत, विश्वनाथ कोळी, मीनाक्षीताई पाटील, दीपाली म्हात्रे, दर्शन ठाकूर, वैभव ठाकूर, जयवंत देशमुख, सुधीर ठाकूर उपस्थित होते. भार्गव ठाकूर (चेअरमन रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल उलवे) यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी सर्वांनी राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीताचा मान राखून ध्वजारोहणानंतर 'भारत माता की जय', वंदे मातरम' आणि जय जवान जय किसान अशा घोषणा देऊन सोहळ्याची सांगता करण्यात आली. त्यानंतर शाळेतर्फे उपस्थितांना अल्पोपहार देण्यात आला. अत्यंत शिस्तबद्ध वातावरणात हा सोहळा पार पडला.





**पनवेल : वंदे मातरम जनरल कामगार संघटनेच्या सत्यनारायण महापूजेचे महापालिका माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, नगरसेविका दर्शना भोईर, संघटनेचे उपाध्यक्ष रवी नाईक आदींनी दर्शन घेतले. त्यांचे स्वागत करण्यात आले.**

# अश्लील इशारे केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**नवीन पनवेल :** महिलेला अश्लील इशारे केल्याप्रकरणी भास्कर नारायण शिंदे (राहणार, यशोज लाईन, आरएएफ बटालियन नंबर १०२, खारघर) याच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित फिर्यादी या आरएएफ सिग्नल, पापडीचा पाडा येथील रिक्षा स्टॅन्डवरील बाकड्यावर बसलेले असताना आरोपीने त्यांच्याजवळ येऊन पैशांचा इशारा करून जवळ बोलावले आणि छेड काढली. त्यानंतर पुन्हा अश्लील इशारा केला. याप्रकरणी आरोपी भास्कर नारायण शिंदे याच्याविरोधात १ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# वक्तृत्व आणि निबंध स्पर्धेत लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्यु. कॉलेज कामोठेचे यश





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पनवेल महानगरपालिकेतर्फे घेण्यात आलेल्या वक्तृत्व आणि निबंध स्पर्धेत लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्यु. कॉलेज कामोठे या विद्यालयाने घवघवीत यश प्राप्त केले. सदर स्पर्धा दिनांक ६ एप्रिल रोजी घेण्यात आली होती. त्याचा निकाल १ मे रोजी बुद्ध पौर्णिमेच्या निमित्ताने वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह पनवेल येथे जाहीर करण्यात आला.

सदर स्पर्धेत लहान गट इयत्ता पाचवी ते सातवी निबंध स्पर्धा या प्रकारामध्ये विद्यालयाच्या स्वरा पाटीलने द्वितीय क्रमांक पटकावला, तर नववी ते बारावी या गटामध्ये विद्यालयाच्या श्रेया वाक्षे हिने वक्तृत्व स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक पटकावला. तसेच खुला गट वक्तृत्व स्पर्धा प्रकारामध्ये विद्यालयाच्या शिक्षिका दीपाली कुलकर्णी यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. रोख रक्कम द्वितीय क्रमांकास चार हजार, तर तृतीय क्रमांकास तीन हजार, चषक व प्रशस्तीपत्र असे पारितोषिकाचे स्वरूप आहे.

विद्यालयाच्या प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे या नेहमीच केवळ विद्यार्थीच नव्हे तर शिक्षकांनाही विविध स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी प्रोत्साहित करीत असतात. यातूनच विद्यालयाला हे यश प्राप्त झाले. त्यांचे मार्गदर्शन आणि प्रेरणा ही नेहमीच उपयुक्त असते. विद्यालयाचे चेअरमन आमदार प्रशांत ठाकूर यांनी सर्वांचे अभिनंदन केले आहे. तसेच विद्यालयाचे नाव असेच उंचावण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचा सल्लाही त्यांनी दिला. रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल मेंबर माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनीही सर्वांचे अभिनंदन केले व विद्यालयाची उत्तरोत्तर प्रगती व्हावी, असा आशावाद व्यक्त केला.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सतत प्रयत्नशील असणाऱ्या प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबरच याही क्षेत्रात पारंगत होण्याचा सल्ला दिला. तसेच शिक्षकांनी शिकवण्याबरोबरच स्वतःमध्येही विविध प्रकारे गुणांची वृद्धी करावी यासाठी अशा स्पर्धांमध्ये भाग घ्यावा, असे प्रतिपादन केले. या सर्वांचे अभिनंदन विद्यालयाच्या पर्यवेक्षिका सारिका लांजुडकर तसेच नेहा खन्ना, मीनल नाईक व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आदींनी केले.

# उरणमधून बारावीत प्रियांशी जामनेरकर प्रथम

**उरण : वार्ताहर, बातमीदार**

बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी निकालाचा दिवस तसा कौतुकाचा आणि आनंदाचा होता. सर्वत्र गुणवंत विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत असताना अकोला जिल्ह्यातील अनकवाडी या छोट्याशा गावातील कुमारी प्रियांशी आशाराम जामनेरकर या विद्यार्थिनीने मुंबईत विभागातील उरण या तालुक्यात बाजी मारली आहे.

उरण येथील सिटीजन हायस्कूल अँड ज्युनियर कॉलेजमध्ये ८७.५०% गुण घेत घवघवीत यश प्राप्त करून सायन्स शाखेतून उरण तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. सिटीजन हायस्कूल ज्युनिअर कॉलेज उरण येथे शिक्षण घेऊन शिक्षक सादिक सर, शैलेंद्र प्रजापती, नरेंद्र पाटील, प्रमोद पाटील व साजिया मामी यांच्या मार्गदर्शनाखाली व विवेकानंद येथील कोचिंग क्लासेसमध्ये शिक्षक दत्तात्रय शेळके, मयूर पाटील, आदित्य सर यांचे मार्गदर्शन घेऊन उत्तम अभ्यास करून तालुक्यातील पहिला क्रमांक पटकावला आहे. प्रियांशीचे वडील शेतकरी असून उरण येथे एसटी बसचालक आहेत व आईचे वडापावचे दुकान आहे. तिने दहावीपर्यंत जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटमध्ये शिक्षण घेतले. स्नितिल पडते यांच्या मार्गदर्शनाखाली तिसरा क्रमांक दहावीत पटकावला होता.

## संपादकीय

# मानवतेला काळिमा

पुणे जिल्ह्याच्या भोर तालुक्यातील नसरापूर आणि चाकण परिसरात घडलेल्या दोन अमानुष घटनांनी संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. निरागस बालकांवर झालेला लैंगिक अत्याचार आणि त्यानंतर केलेल्या निर्घृण हत्या या केवळ गुन्हेगारी घटना नाहीत, तर समाजाच्या संवेदनशीलतेला आणि मानवतेलाच काळिमा फासणाऱ्या आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने घेतलेली तातडीची दखल, कठोर कारवाईचे संकेत आणि न्यायप्रक्रिया जलदगतीने पूर्ण करण्याचा निर्धार हा अत्यंत महत्त्वाचा आणि आवश्यक आहे.

**नसरापूर येथे चार वर्षांच्या बालिकेवर झालेल्या अत्याचारानंतर तिची हत्या करून मृतदेह लपविण्याचा प्रयत्न करण्यात आला. ही घटना उघडकीस आल्यानंतर राज्यभर संतापाची लाट उसळली. त्यानंतर लगेचच चाकण परिसरात तीन वर्षांच्या चिमुकल्यावर अनैसर्गिक अत्याचार करून त्याची हत्या केल्याचा प्रकार समोर आला. या दोन घटनांमुळे पालकांच्या मनात भीती निर्माण झाली असून समाजात असुरक्षिततेची भावना वाढली आहे. मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनांची गंभीर दखल घेतली असून आरोपींविरोधात कठोरात कठोर कारवाई करण्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत. विशेष म्हणजे या प्रकरणांची सुनावणी जलदगतीने व्हावी यासाठी स्पेशल फास्ट ट्रॅक कोर्ट स्थापन करण्यासाठी उच्च न्यायालयाकडे विनंती करण्याचा निर्णय हा न्यायप्रक्रियेतील विलंब टाळण्यासाठी महत्त्वाचा ठरेल. यासोबतच विशेष सरकारी वकील नियुक्त करून आरोपींना मृत्युदंडाची शिक्षा व्हावी यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. या भूमिकेमुळे सरकारचा गुन्हेगारांविरोधातील कठोर दृष्टिकोन अधोरेखित होतो. भारतामध्ये बालकांवरील लैंगिक अत्याचारांविरोधात कठोर कायदे अस्तित्वात आहेत. 'पॉक्सो' कायद्यांतर्गत अशा गुन्ह्यांना गंभीर शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे तसेच निर्भया प्रकरणानंतर भारतीय दंड संहितेत करण्यात आलेल्या दुरूस्त्यांमुळे बलात्कार आणि हत्या यांसारख्या गुन्ह्यांसाठी अधिक कठोर शिक्षा लागू करण्यात आल्या आहेत, मात्र केवळ कायदे कठोर असून उपयोग नाही, तर त्यांची प्रभावी अंमलबजावणी आणि जलद न्याय ही तितकीच आवश्यक बाब आहे. राज्य सरकार याच दिशेने ठोस पावले उचलताना दिसत आहे. या घटनांमध्ये पोलिसांनी केलेली तातडीची कारवाईही उल्लेखनीय आहे. दोन्ही प्रकरणांत आरोपींना अल्पावधीत ताब्यात घेण्यात आले असून पुढील तपास वेगाने सुरू आहे. यावरून राज्यातील कायदा–सुव्यवस्था यंत्रणा सजग असल्याचे दिसून येते, मात्र गुन्हा घडल्यानंतरची कारवाई जितकी महत्त्वाची आहे, तितकेच गुन्हे रोखण्यासाठीचे प्रतिबंधात्मक उपायही आवश्यक आहेत. तंत्रज्ञानाचाही उपयोग या लढ्यात प्रभावीपणे करता येऊ शकतो. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे जाळे अधिक व्यापक करणे, 'डायल ११२'सारख्या आपत्कालीन सेवांचा प्रसार तसेच महिला व बालसुरक्षेसाठी विशेष ॲप्सचा वापर वाढविणे यामुळे गुन्हे रोखण्यास मदत होऊ शकते. राज्य सरकारने या बाबतीत आधीच काही उपक्रम सुरू केले आहेत. या पार्श्वभूमीवर समाजाची भूमिकाही तितकीच महत्त्वाची ठरते. केवळ सरकार किंवा पोलिसांवर सर्व जबाबदारी टाकून चालणार नाही. प्रत्येक नागरिकाने सतर्क राहून सुरक्षिततेची जबाबदारी उचलणे आवश्यक आहे. अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी शासन, प्रशासन आणि समाज या तिन्ही घटकांनी एकत्रितपणे काम करणे गरजेचे आहे. कठोर कायदे, प्रभावी अंमलबजावणी, जनजागृती आणि सामाजिक जबाबदारी या चौकटीतूनच सुरक्षित समाजाची निर्मिती शक्य आहे.**

# घरगुती व वाणिज्य गॅसटंचाई अन् चुलीची आठवण



**खबरबात**
विजय मांडे

अमेरिका–इराण युद्ध सुरु झाले आणि अनेक वस्तूंची टंचाई भासणार या भीतीने अनेकांनी दररोज लगणाऱ्या वस्तूंचा साठा केला. त्यामध्ये स्वयंपाका साठी लागणाऱ्या वस्तूही मिळेल तिथून घेऊन कुणी तीन महिने पुरेल इतके तर कुणी सहा महिने–वर्षभर पुरेल इतके सामान आणून ठेवले मात्र ते शिजविण्यासाठी गॅस सिलेंडरचा साठा कुणीच करू शकले नाही. त्यामुळे पूर्वी चुलीवर अन्न शिजवत असत त्याची आठवण झाली. त्यावर उपाय म्हणून काहींनी इलेक्ट्रिक शेगड्या घेतल्या. तर हॉटेल व्यवसायिकांनी डिझेलच्या शेगड्या घेऊन आपला व्यवसाय सांभाळण्याचा प्रयत्न केला.

पूर्वी ग्रामीण भागात चुलीवर जेवण करीत असत. आता आदिवासी वाडया वगळता सर्वच ठिकाणी घरगुती गॅस वापरला जातो. चुलीचा वापर केल्याने महिलांना धुराचा त्रास होतो म्हणून गरीब महिलांना मोफत गॅस कनेक्शनसाठी केंद्र सरकारची प्रधानमंत्री उज्वला योजना राबवली आहे. ज्याअंतर्गत मोफत गॅस कनेक्शन, शेगडी आणि सिलिंडर मिळतात महाराष्ट्रात, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेअंतर्गत पात्र महिलांना वर्षाला 3 गॅस सिलिंडर मोफत मिळतात. त्यामुळे बहुतांश ठिकाणी गॅस सिलेंडरचा वापर केला जातो. कर्जत मध्ये एच पी गॅस आणि भारत गॅस अशी दोन गॅस वितरण केंद्र आहेत.

इराण–अमेरिका युद्ध सुरु झाले आणि इंधनाचा तुटवडा होऊ लागला. त्यामुळे सर्वात अगोदर हॉटेल व्यवसायिकांना फटका बसू लागला. काहींनी पदार्थ बनवणे बंद केले तर काहींनी आपली हॉटेल बंद ठेवली होती. काळ्या बाजारातून वाणिज्य गॅस सिलेंडर घेऊन व्यवसाय करण्यापेक्षा व्यवसाय बंद ठेवणे सोईचे झाले. मात्र कामगारांना कसे सांभाळायचे असा प्रश्न काहींना पडला त्यामुळे त्यांनी दगडी कोळश्यावर चालणाऱ्या शेगड्या घेतल्या तर काहींनी डिझेलवर चालणाऱ्या शेगड्या आणून हॉटेल व्यवसाय सुरु ठेवला. परंतु त्यांचा त्रास कामगारांना होऊ लागल्याने तो प्रयत्न म्हणजे तात्पुरता इलाज ठरला. घरगुती गॅस मिळेल की नाही? या भीती मुळे गॅस वितरक केंद्रांवर ग्राहकांची गर्दी होऊ लागली. वादा वादीमुळे पोलिसांना बोलवावे लागले. काहींचे रांगेत ठेवलेले रिकामे सिलेंडर सुद्धा चोरीला गेले. मोठ्याच्या मोठ्या रांगा केंद्रासमोर होऊ लागल्या. शहरात राहूनही अनेक ग्राहकांना 25 दिवसांच्या ऐवजी 45 दिवसांनी गॅस सिलेंडर बुकिंग करावा. अशा सुचना बुक करताना येऊ लागल्या. त्यामुळे सिलेंडर 45 दिवस कसा पुरवायचा असा प्रश्न पडू लागला.



याबाबतच्या ग्राहकांनी आपल्या तक्रारी तहसील कार्यालयात केल्या नंतर पुरवठा निरीक्षण अधिकारी रवींद्र दळवी यांनी भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडच्या रायगड विभागाचे व्यवस्थापक राजीव कनोजिया यांना पत्र पाठविले. या पतत्रामध्ये श्री कर्जत भारत गॅस सर्व्हिसची नोंदणी 45 दिवसां ऐवजी 25 दिवसांची करावी अशी विनंती केली याबाबत रायगड जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम सभापती पुंडलिक पाटील यांनी असे पुरवठा निरीक्षण अधिकारी रवींद्र दळवी यांची भेट घेऊन चर्चा केली व याबाबत लवकरात लवकर मार्ग काढावा. अशी मागणी केली आहे. तसेच पाटील यांनी भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडच्या रायगड विभागाचे व्यवस्थापक राजीव कनोजिया यांच्याशी संपर्क करून चर्चा केली. त्यावेळी कनोजिया यांनी येत्या तीन – चार दिवसात सकारात्मक प्रयत्न करू. असा शब्द दिला. मात्र त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली नाही. खासदार सुनील तटकरे यांनीही त्यामध्ये लक्ष घातले परंतु अद्याप तशा सुचना आल्या नाहीत.

याबाबत सामाजिक कार्यकर्ते रमेश कदम यांनी या विषयात लक्ष घालण्याचे ठरविले. त्यांनी आत्ता पर्यंत तब्बल 37 आंदोलने केली आहेत. त्यात धरणे आंदोलन, ठिय्या आंदोलन, साखळी उपोषण, आमरण उपोषण, खड्ड्यात बसून आंदोलन अशा अनेक आंदोलनांचा समावेश आहे. त्यांनी घरगुती व वाणिज्य गॅस सिलेंडरांचे वितरण व्यवस्थित व्हावे यासाठी नुकतेच आमरण उपोषणाचे हत्यार उपसले होते. त्यावेळी त्यांनी शहरी भागासाठी गॅस सिलेंडर बुकिंगसाठी 45 दिवसाचा कालावधी दिलेला आहे तो 25 दिवसाचा करण्यात यावा. बुकिंग झाल्यानंतर गॅस सिलेंडर त्या दिवशी वेळी दिला जात नाही तो त्याच दिवशी देण्यात यावा. लग्न समारंभ, हरिनाम सप्ताह, सत्यनारायण पूजा आदी कार्यक्रमांसाठी गॅस सिलेंडर देण्यात येत नाही ते देण्यात यावे. बुकींगसाठी आलेल्या ग्राहकांना मंडप व पाणी व बसण्याची व्यवस्था करण्यात याव्यात. आदी मागण्यांसाठी बेमुदत आमरण उपोषण सुरु केले होते. त्यातील मागण्या पूर्ण झाल्या. मात्र बुकिंगसाठी 45 दिवसाचा कालावधी दिलेला आहे तो 25 दिवसाचा करण्यात यावा. ही मागणी केंद्र स्तरावरील असल्याने त्याचा पाठपुरावा शासन स्तरावर करावा लागत असल्याने तो मुद्दा बाजूला ठेवला आणि उपोषण स्थगित केले. याचा परिणाम असा झाला की एरव्ही केंद्रासमोर असणाऱ्या रांगा कमी झाल्या आणि येणारे सिलेंडर व्यवस्थित येऊ लागल्याने ग्राहकांच्या प्रतिक्रिया चांगल्या येऊ लागल्या. भारत गॅसचे दर्शन ठक्कर यांनी चांगले सहकार्य केले. वाणिज्य गॅस सिलेंडर साठी सुमारे एक हजार रुपयांची वाढ झाली आहे. त्यामुळे सुमारे पन्नास टक्के वाढदिवसाच्या झाली आहे. त्यामुळे काही समाज माध्यमांनी घरगुती गॅस सिलेंडर 500 रुपयांनी वाढणार असल्याचे मॅसेज फिरत आहेत. 500 नाही पण 300 रुपये वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्यामुळे या युद्धामुळे सामान्य जनांचे व व्यवसायिकांचे कंबरडे नक्कीच मोडेल हे कटु सत्य आहे.



## बदलते तंत्रज्ञान

### ओबेन रोर इवो इलेक्ट्रिक बाईक लाँच

नवी दिल्ली३ दिवसांपूर्वी इलेक्ट्रिक टू–व्हीलर स्टार्टअप ओबेन इलेक्ट्रिकने भारतात आपली नवीन इलेक्ट्रिक मोटरसायकल 'रोर इवो' लॉन्च केली आहे. ओबेन रोर इवोला कंपनीच्या लाइनअपमध्ये रोर EZ आणि रोर EZ सिग्मा यांच्यामध्ये स्थान देण्यात आले आहे.



यात १८०km च्या रेंजसह अँटी–थेफ्ट अलर्टसारखे फीचर्स मिळतील. कंपनीने याची सुरुवातीची किंमत ९९,९९९ रुपये (एक्स–शोरूम, दिल्ली) ठेवली आहे. ही किंमत पहिल्या १०,००० ग्राहकांसाठीच वैध असेल.

यानंतर बाईकची किंमत वाढून १,२४,९९९ रुपये होईल.

डिझाइन: पूर्वीपेक्षा अधिक शार्प आणि स्पोर्टी

ओबेन रोर इवोची डिझाइन कंपनीच्या मागील बाईक्सपेक्षा खूप वेगळी आणि आधुनिक आहे. याच्या समोरच्या बाजूला सिंगल प्रोजेक्टर हेडलाइटसह वरच्या बाजूला LED DRL स्ट्रिप दिली आहे, जी याला शार्प लुक देते. बाईकमध्ये आक्रमक टँक श्राउड आणि स्लीक टेल सेक्शन मिळते, जे याला स्पोर्टी लुक देते. ही चार रंगांमध्ये – न्यूट्रॉन ब्लू, पल्स रेड, मॅग्नेटिक ब्लॅक आणि फोटॉन व्हाईटमध्ये उपलब्ध आहे.

बॅटरी: यात ३.४ kWh ची LFP (लिथियम आयर्न फॉस्फेट) बॅटरी दिली आहे, जी ॲल्युमिनियम हाउसिंगमध्ये सुरक्षित आहे. याला IP६७ रेटिंग मिळाली आहे, म्हणजे ही धूळ आणि पाण्यापासून सुरक्षित आहे.

रेंज: कंपनीचा दावा आहे की एकदा पूर्ण चार्ज झाल्यावर ही बाईक १८० किमी (IDC रेंज) पर्यंत धावेल.

चार्जिंग: फास्ट चार्जरच्या मदतीने ही ० ते ८०% पर्यंत फक्त ९० मिनिटांत चार्ज होते. यात ऑनबोर्ड चार्जरची सुविधा देखील मिळते.वेग: ही बाईक केवळ ३ सेकंदात ० ते ४० किमी/तास वेग पकडते. याचा कमाल वेग ११० किमी/तास आहे.बाईकमध्ये ५–इंचचा TFT डिस्प्ले देण्यात आला आहे, जो ब्लूटूथ कनेक्टिव्हिटीला सपोर्ट करतो. याच्या मदतीने रायडर टर्न–बाय–टर्न नेव्हिगेशन, म्युझिक कंट्रोल, कॉल आणि मेसेज अलर्ट आपल्या स्क्रीनवर पाहू शकतात. याव्यतिरिक्त, यात फॉल अलर्ट, रिव्हर्स मोड, रीजेनरेटिव्ह ब्रेकिंग आणि २ USB चार्जिंग पोर्ट्स यांसारखी वैशिष्ट्ये देखील आहेत. ओबेन ॲपद्वारे युझर रिमोट ट्रॅकिंग, अँटी–थेफ्ट अलर्ट आणि जिओ–फेन्सिंग यांसारख्या सुविधांचा लाभ घेऊ शकतात.

# कादंबरी-कथाकार बाबा कदम



**निमित्त**

४ मे १९२९ रोजी अक्कलकोटमध्ये जन्मलेले वीरसेन आनंदराव ऊर्फ 'बाबा' कदम हे अत्यंत लोकप्रिय आणि बहुप्रसवा कादंबरीकार आणि कथाकार होते. जवळपास सत्तर कादंबऱ्या, वीसहून जास्त कथासंग्रह त्यांच्या लेखणीतून उतरले आहेत. त्यांनी अध्यात्माविषयी लिखाणही केलं होतं.

पोलीस वकील म्हणून काम करत असताना त्यांनी मानवी स्वभावाचे अनेक पैलू बघितले आणि आपल्या कथा–कादंबऱ्यांमधून ते प्रभावीपणे मांडले. त्यांच्या 'भालू'सारख्या कादंबऱ्यांवर सिनेमेही बनले. आधार, अजिंक्य, इस्टेट मॅनेजर, बदला, भालू, निर्मला, पद्मजा, पिकनिक, प्रतीक्षा, राही, राजधानी, राजलक्ष्मी, सकीना, साकी, सन्ना, सरला यांसारखी त्यांची अनेक पुस्तकं प्रसिद्ध आहेत.

बाबा कदम यांचा जन्म अक्कलकोट येथे झाला. १९५२ मध्ये ते बी.ए झाले आणि १९५४ मध्ये पुणे विद्यापीठातून एल्एल.बी. झाले. १९५४ ते १९५८ या ४ वर्षांत त्यांनी फौजदारी कोर्टात वकिली केली. १९५९ पासून पोलीस प्रॉसिक्यूटर म्हणून ३१ वर्षे नोकरी केली. वकिलीच्या व नोकरीच्या निमित्ताने आलेल्या अनुभवांतून ९१ कादंबर्या (सर्व सत्य घटनांवर आधारित) त्यांनी लिहिल्या . बहुतेक सर्व कादंबर्यांच्या अनेक आवृत्त्या निघाल्या असून वाचकांचा उदंड प्रतिसादही कादंबर्यांना लाभला . शास्त्रीय संगीत ऐकणे, शिकार करणे आणि चित्रकला असे त्यांचे छंद होते. त्यांनी सुमारे ८०० उत्तम चित्रे काढली आहेत.


त्यांच्या काही गाजलेल्या कादंबर्यांत 'डोंगरची मैना','चौफेर','कॉकटेल सर्किट''सभा''बलिदान'स्टार विटनेस''जोहार''इस्टेटमॅनेजर','नजर कैद','निराधार','मानस कन्या', 'परमानंद''एक होती बेगम','बॉम्बे पोलीस','वाळवंटातील फूल,'निष्पाप बळी', 'आमराई','मिनिस्टर','राजलक्ष्मी', 'बिनधास्त''निष्कलंक','ज्वालामुखी' इत्यादींचा उल्लेख करावा लागेल.कदम यांनी वाचकांचे रंजन करणे हे प्रमुख उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून त्यांना गुन्हेगारी जगाचे जवळून दर्शन घडवले. वेगवान कथानक, वाचकांना खिळवून ठेवणारी शैली यांमुळे त्यांच्या कादंबऱ्या अत्यंत लोकप्रिय झाल्या.

आठ मराठी चित्रपटांचे पटकथा व संवादलेखन त्यांनी केले 'भालू', 'जोतिबाचा नवस','दगा','पाच नाजूक बोटं','देवाशपथ खरं सांगेन','प्रलय','उनाड मैना', 'सभा' हे चित्रपट त्यांच्या कादंबऱ्यांवर आधारित आहेत. या व्यतिरिक्त 'बूमरँग' या कादंबरीवरून 'कलंदर' हे नाटक त्यांनी लिहिले. तेविसाव्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवामधे १९८५–१९८६ साली 'देवाशपथ खरं सांगेन' याचित्रपटासाठी उत्कृष्ट कथेचे पारितोषिक त्यांना प्राप्त झाले.

करवीर भूषण पुरस्कार २०००, करवीर जीवन गौरव पुरस्कार २००३, पुण्याच्या पुलोत्सवात चित्रकर्मी पुरस्कार २००८, कोल्हापूरचा मृत्युंजय पुरस्कार २००५ हे त्यांना मिळालेले प्रमुख पुरस्कार होत. औरंगाबाद येथील साहित्य संमेलनातील प्रकट मुलाखतीला श्रोत्यांकडून त्यांना मनःपूर्वक प्रतिसाद मिळाला. या बहुप्रसव कादंबरीकाराला वाचकांचे उदंड प्रेम लाभले, तरी समीक्षकांनी मात्र त्यांच्या साहित्याची फारशी दखल घेतली नाही

**–शशिकला उपाध्ये**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### रात्री दुधात मिसळून 'हा' पदार्थ खाल्ल्याने फायदे

दूध हे आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर असते. हा पोषकतत्वांचा चांगला स्त्रोत आहे. दुधाला संपूर्ण आहार मानले जाते. मात्र दुधासोबत अनेक हेल्दी गोष्टी मिसळून खाल्ल्याने त्याचे पोषणमूल्य अधिक वाढते. दूध आणि मखाणा यामध्ये प्रोटीन आणि कॅल्शियमने भरपूर असतात यामुळे ते एकत्र खाल्ल्याने याचे फायदे दुपटीने वाढतात.



दूध आणि मखाणा एकत्र खाल्ल्याने पोटासाठी चांगले असते कारण या दोन्हीमध्ये फायबरचे प्रमाण जास्त असते. तसेच यामुळे पाचनशक्ती सुधारते आणि पोटाचे आजार दूर होतात. मखाणा घातलेले दूध तुमची हाडे आणि दातांचे आरोग्य चांगले राखतात. कारण दूध आणि मखाणे या दोन्हीमध्ये कॅल्शियमचे प्रमाण जास्त असते जे हाडे स्वस्थ आणि निरोगी राखण्यास मदत करतात. यामुळे दातही मजबूत होण्यास मदत होते.

मखाणा आणि दुधाचे सेवन हृदयाचे आरोग्य सुधारण्यास मदत करतात, कारण या दोन्हींमध्ये पोटॅशियम आणि मॅग्नेशियमचे प्रमाण चांगले असते. यामुळे ब्लड प्रेशरसारखे त्रास नियंत्रणात ठेवण्यास मदत तसेच हृदयाचे आरोग्य चांगले राखतात.

दूध आणि मखाणा एकत्र खाल्ल्याने थकवा, अशक्तपणासारख्या समस्याही दूर होतात. यामुळे तुम्हाला लगेचच एनर्जी मिळते.


व्हिटामिन, मिनरल्स आणि अँटीऑक्सिडंटने भरपूर असल्याने हे ड्रिंक तुमच्या मेंदूलाही निरोगी ठेवते. तसेच मेंदूचे कार्यही वेगवान करते.

दूध आणि मखाणा एकत्र खाल्ल्यास शरीरास व्हिटामिन ए, ई आणि अँटीऑक्सिडंट मोठ्या प्रमाणात मिळतात यामुळे शरीरातील हानिकारक फ्री रॅडिकल्सपासून संरक्षण होते. हे एक प्रकारे अँटी एजिंग ड्रिंक प्रमाणे काम करते.

दरम्यान, वजन कमी करण्यासाठी मदत तुम्हाला जर तुमचे वजन कमी करायचे असेल तर तुम्ही तुमच्या आहारात मखाणाचा समावेश करू शकता. मखाणामध्ये भरपूर प्रमाणात कॅल्शियम असते त्यामुळे हाडे मजबूत बनवते. मखाणा रोगप्रतिकारशक्ती वाढवते, रक्तातील साखरेवर नियंत्रण ठेवते व पचनक्रिया सुधारते.

# ‘सेल्फी’साठी कनेक्टिंग लिंकवर थांबू नका; सीसीटीव्हीची २४x७ राहणार नजर

## एमएसआरडीसीचे वाहनधारकांना आवाहन



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

यशवंतराव चव्हाण मुंबई –पुणे द्रुतगती मार्गावरील कनेक्टिंग लिंक (मिसिंग लिंक) लोकार्पणानंतर वाहतुकीसाठी सुरू करण्यात आली आहे. मात्र, प्रवासादरम्यान सेल्फी, फोटो, घेण्यासाठी वाहन चालक केबल स्टेड ब्रिज व बोगद्याजवळ वाहने थांबवत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. द्रुतगती मार्गावर वाहने थांबवण्यास परवानगी नसून वाहनधारकांसाठी अपघाताचा धोका असल्याने ते टाळावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्यावतीने करण्यात येत आहे.

महाराष्ट्र दिनी रोजी यशवंतराव चव्हाण मुंबई–पुणे मार्गावरील कनेक्टिंग लिंक अर्थात मिसिंग लिंकचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह अन्य मान्यवरांच्या हस्ते लोकार्पण झाले.

मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावरील प्रवाशांना या आधी बोरघाटातील नजारा नजरेत साठवून ठेवण्याचा मोह आवरता येत नव्हता. त्यामध्येच मिसिंग लिंकचा नजरा काही औरच आहे. बाजुची खोल दरी, त्यापुढे ऐतिहासिक चावणी खिंड, घनदाट जंगल तर उजव्या बाजूला टायगर व्हाली, काही अंतरावरुन जाणारा मुंबई पुणे लोहमार्ग, जुना व द्रुतगती महामार्गावरील अमृतांजन पुला जवळील परीसर, वाघजाई मंदिर, असा निसर्ग पहावयास मिळत असतानाच मिसिंग लिंकचा स्टेड पुल महाकाय बोगदे येथूनच ऊगम पावणारी अंबानदी या नादात आपण मनाई आदेशाचे उल्लंघन करीत तर नाही ना याची तमा न बाळगता आर्थिक भुर्दंड सोसावा लागत असतानाही प्रवासी चक्क पुलावर थांबून फोटोसेशन करीत आहेत.

महामार्ग पोलिसांनी अधिसूचनेद्वारे मुंबई–पुणे कनेक्टिंग लिंक प्रकल्पासाठी वेग मर्यादा जाहीर केली आहे. तसेच बोगद्यात हलक्या मोटार वाहनांसाठी ताशी १०० किमी वेग मर्यादा आणि बस व प्रवासी वाहनांसाठी ताशी ८० किमी वेग निश्चित केला आहे. कनेक्टिंग लिंक प्रकल्पातील दोन बोगदे व दोन पुलावर पूर्णपणे २४x७ सीसीटीव्ही यंत्रणेचे लक्ष आहे. यावर देखरेख ठेवण्यासाठी स्वतंत्र नियंत्रण कक्ष असून द्रुतगती मार्गावर थांबणाऱ्या गाड्यांची माहिती महामार्ग पोलिसांना दिली जाणार आहे.

सेल्फी, फोटो आणि रिल काढण्यासाठी थांबू नका, नाहीतर मोठ्या दंडाची आकारणी होऊ शकते. तसेच तुमच्यासह इतरांच्याही वाहनांना धोका होऊ शकतो. या कारणास्तव, नियमांचे पालन करा आणि सुरक्षित, सुखकर प्रवास करा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.

## कर्जत–मुरबाड महामार्गावर अपघात; सापेले येथील तरुणाचा मृत्यू

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत – मुरबाड महामार्गावर भोईरवाडी गावाजवळ शनिवारी काल सायंकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास झालेल्या मोटरसायकलच्या समोरा समोरील भीषण अपघातात सापेले येथील महेश परशुराम मोरे (वय ४८) यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

महेश मोरे आपले कर्जत येथील काम आटोपून ते पल्सर मोटरसायकल वरून सापेले येथील आपल्या घरी परतत असताना भोईरवाडीजवळ समोरून येणाऱ्या बुलेट मोटारसायकलशी त्यांची जोरदार धडक झाली. या अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर बुलेटवरील चालकाने घटनास्थळावरून पळ काढला असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत. कर्जत पोलिस ठाण्याच्या वतीने सहाय्यक पोलिस निरीक्षक मनीषा लटपटे या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत.



## ट्रान्सफॉर्मर जळाल्याने काशीद येथे वीज ठप्प



**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यामधील काशीद ग्रामपंचायत ही महत्वाची ग्रामपंचायत असून येथे मोठ्या प्रमाणात पर्यटक येत असतात.यावेळी शनिवार रविवार चे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात पर्यटक येथे आले होते.

परंतु महावितरण च्या गलथान कारभारामुळे येथील ट्रान्सफॉर्मर जळयाल्यामुळे गेली कित्येक तास वीज गायब झाली आहे.अनेक तास वीज गेल्याने पर्यटक खूप वैतागून अखेर त्यांनी रुम सोडून ज्यांनी त्यांनी आपले घर गाठले आहे. त्यामुळे काशीद मधील असंख्य लॉज मालकांचे मोठे नुकसान झाले आहे.

महावितरणला सर्वाधिक मोठा महसूल वीज बिलाद्वारे काशीद येथून मिळत असताना येथे सुविधा मात्र दिल्या जात नसल्याने वीज ग्राहकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

ट्रान्सफॉर्मर जळण्याची घटना घडत असल्याने आमचे फार मोठे आर्थिक नुकसान होत असल्याचे अनेक लॉज मालकांनी सांगितले आहे. मोठ्या प्रमाणात पर्यटक आले असताना वीज गायब झाल्याने पर्यटक सुद्धा त्रस्त झाले आहेत.

मुरुड तालुक्याचे तापमान ३९ डिग्री सेल्सिअस असल्याने सर्वांना घामाच्या धारा लागल्या आहेत अशातच काशीद येथील अनेक तास वीज गेल्याने पर्यटक खूप वैतागून गेले आहेत.

या बाबत आमच्या प्रतिनिधीने शाखा अभियंता शेख यांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की,त्रास्फार्मर लवकरच बसवण्याची प्रक्रिया सुरु असून संध्याकाळ पर्यंत वीज पुरवठा सुरू होईल.आमचे प्रयत्न सुरू आहेत तर काशीद ग्रामपंचायत सरपंच संतोष राणे यांनी,महावितरणचे अधिकारी सुस्तावले असल्याचे सांगितले आहे.

## डॉ. संगीता वानखेडे यांची वैद्यकीय अधिकारी म्हणून केलेली प्रदीर्घ सेवा निश्चितच उल्लेखनीय –नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे

**खोपोली : प्रतिनिधी**

डॉक्टर संगीता वानखेडे या डॉ.बाबासाहेब रुग्णालयात ३२ वर्षे प्रदीर्घ सेवा करुन निवृत्त झाल्या या प्रित्यर्थ त्यांचा सेवापूर्ती समारंभ लायन्स क्लब कम्युनिटी हॉल येथे आयोजित करण्यात आला होता.



याप्रसंगी बोलताना नगराध्यक्षांनी वरील उद्गार काढले. पुढे बोलताना ते म्हणाले की, वानखेडे मॅडमनी आपल्या शांत,संयमी व मनमिळाऊ स्वभावामुळे रुग्णांना दिलासा मिळत असे तसेच स्टाफ बरोबर त्यांचे संबंध अत्यंत खेळीमेळीचे असत. कठोर परिश्रम व अचूक निदान, योग्य मार्गदर्शन यामुळे त्या शेवटपर्यंत जनप्रिय राहिल्या. सर्व नगरसेवक व स्टाफतर्फे मी त्यांना उर्वरित आयुष्य सुखी, समाधनी व निरामय जावो अशी सदिच्छा व्यक्त करतो. यावेळी मंचावर जिल्हा रुग्णालयाचे सिव्हिल सर्जन डॉ. निशिकांत पाटील, कोकण विभागीय उपायुक्त अरविंद नातू, माजी मुख्याधिकारी धुपे साहेब, कारचे साहेब,माजी नगराध्यक्ष सोहनराज राठोड , दत्ताजीराव मसूरकर,बाल शिक्षण सभापती सुवर्णा मोरे, बांधकाम सभापती अनिल सानप, नियोजन सभापती मयुरी रेठरेकर विनिता कांबळे तसेच नगरसेवक हरीश काळे, संदीप पाटील, निजामुद्दीन जळगावकर, राहुल गायकवाड, श्री किरवे, केविना गायकवाड, रेश्मा गायकवाड,श्वैला अहिर,डॉक्टर प्रमोद वानखेडे आदी मान्यवर उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते धन्वंतरी पूजन व दीपप्रज्वलनाने समारंभाची सुरुवात झाली. नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, डॉक्टर निशिकांत पाटील व सर्वच मान्यवरांचा डॉक्टर प्रमोद वानखेडे, डॉक्टर गजानन चव्हाण व डॉक्टर अलका चव्हाण यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.तसेच खोपोली नगरपरिषदेच्या वतीने सत्कारमूर्ती डॉक्टर संगीता वानखेडे यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी मसूरकर साहेब, धुपे साहेब, नातू साहेब सर्वांनी आपले विचार व्यक्त केले व डॉक्टर संगीता मॅडमना पुढील काळासाठी सुखी, निरमय, आनंदी जीवनासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.समारंभाध्यक्ष डॉक्टर निशिकांत पाटील यांनीही वानखेडे मॅडमच्या दीर्घ आरोग्यसेवेचा गौरव केला व शुभेच्छा दिल्या. डॉक्टर संगीता मॅडम यांनी आपल्या दीर्घ सेवाकाळात नगराध्यक्ष, मुख्याधिकारी, नगरसेवक, कर्मचारी,स्टाफ यांची मोलाची साथ लाभली याबद्दल ऋण व्यक्त केले.तसेच पती प्रमोद वानखेडे, कन्या द्वय डॉ.संपदा व धनश्री यांचे मोलाचे सहकार्य याचाही आवर्जून उल्लेख केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवींद्र घोडके सर यांनी केले. त्यानंतर खोपोलीतील जवळजवळ सर्व डॉक्टर, इनरव्हील क्लब, रोटरी, लायन्स क्लबचे पदाधिकारी, प्रतिष्ठित मान्यवर या सर्वांनी वानखेडे मॅडमचा सत्कार केला.

## रेवदंडा येथे महाराजस्व समाधान शिबिर, शासकीय योजना गावागावात पोहचविण्याचे प्रयत्न –उपविभागीय अधिकारी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा येथे १ मे महाराष्ट्र दिनाचे औचित्याने महाराजस्व समाधान शिबीर महसुल मंडळ चौल यांचे वतीने संपन्न झाले, शासकीय योजना गावागावात पोहचविण्याचा प्रयत्न या शिबीरातून केला जात असल्याचे प्रतिपादन अलिबाग उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण यांनी केले.



रेवदंडा भंडारी समाज सभागृहात शासनाचे वतीने महाराजस्व समाधान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते, या प्रसंगी अलिबाग उपविभागीचय अधिकारी मुकेश चव्हाण हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते, तसेच निवासी नायब तहसिलदार संदिप जाधव यांचेसचौल जि.प.सदस्य डॉ.सचिन राउळ,पंचायत समिती सदस्य शरद गोंधळी, सरपंच प्रफुल्ल मोरे, हेमंत जनार्दन गणपत, या मान्यवरासह मंडळ अधिकारी किहीम मेतरी, मंडळ अधिकारी अलिबागरेवसकर, सहाय्यक महसुल अधिकारी नयन नाईक, नागाव मंडळ अधिकारी नाईक, मल्याण महसुल अधिकारी शुभम चेरू आदीची उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अजित हरवंडे यांनी केले.

उपस्थित मान्यवर चौल जि.प.सदस्य डॉ.सचिन राउळ,पंचायत समिती सदस्य शरद गोंधळी, सरपंच प्रफुल्ल मोरे, हेमंत जनार्दन गणपत यांचे स्वागत शाल,श्रीफळ व पुष्पगूच्छ चौल महसुल मंडळाचे वतीने प्रदान करण्यात आले. तसेच उपस्थित शासकीय अधिकारी यांचे स्वागत चौल महसुल मंडळाचे वतीने पुष्पगूच्छ प्रदान करून करण्यात आले.

या शिबीरात प्रलंबीत फेरफार, सातबारा मधील चुकांची दुरूस्ती, डिजीटल स्वाक्षरीचे सातबारा व ८–अ उताराचे वाटप, उत्पन्न,रहिवाशी,जातीचा प्रमाणपत्र, नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्र,अकृषीक–एनअे तरतुदी बाबत मार्गदर्शन व सुधारणा, नवीन व्यवस्थापनानुसार सनद प्रक्रियेची माहिती, सामाजीक अर्थसहाय्य योजनाचे लाभ मंजूर करणे, विदयार्थ्यासाठी दाखले वाटप करण्यात आले.

## भोर बलात्कार व हत्येप्रकरणी सरकार पीडित कुटुंबाच्या पाठीशी –मंत्री आदिती तटकरे

**पाली : प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील भोर येथील नसरापूर चिमुरडी हत्या प्रकरणात सरकारकडून कुटुंबाला महत्त्वाचं आश्वासन देण्यात आलं आहे. कुटुंबाच्या सूचनेनुसार आणि त्यांच्या विनंतीनुसारच सरकारी वकील नियुक्त केला जाईल, असं स्पष्ट करण्यात आलं आहे. तसेच या प्रकरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही लक्ष घातलं असून गृह विभागाच्या वतीने आवश्यक ती कारवाई केली जात असल्याचं सांगण्यात आलं आहे.




महिला व बालविकास विभागाच्या वतीने कुटुंबाच्या दुःखाची जाणीव व्यक्त करत, या वेदनेची कुठलीही भरपाई होऊ शकत नाही, मात्र सरकार ठामपणे कुटुंबाच्या पाठीशी उभं राहील, असंही आश्वासन मंत्री तटकरे यांनी दिलेआहे.शक्ती कायद्याबाबत सरकारचा निर्णय; आदिती तटकरे यांचे स्पष्टीकरणः महिला सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर प्रस्तावित शक्ती कायद्याबाबत महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी महत्त्वाचं स्पष्टीकरण दिलं आहे. केंद्र सरकारने कायद्यामध्ये केलेल्या नव्या, अधिक कठोर बदलांचा विचार करून उर्वरित तरतुदींचा समावेश करत राज्य सरकार नव्याने शक्ती कायदा आणण्याचा निर्णय घेतल्याचं त्यांनी सांगितलं. तसेच अल्पवयीन मुली आणि महिलांवरील गुन्हे रोखण्यासाठी पोलीस यंत्रणा, स्थानिक प्रशासन आणि नागरिकांनी अधिक सतर्क आणि सक्षम होण्याची गरज असल्याचं त्यांनी अधोरेखित केलं आहे.

## गावरान कैऱ्या अन् रानमेव्याची मज्जा, खवय्यांच्या खरेदीसाठी पडताहेत उड्या...!

**पाली : प्रतिनिधी**

गावरान कच्च्या कैऱ्या तसेच आंब्यांचा हंगाम सुरू झाला आहे. जिल्ह्यातील बाजारापेठांमध्ये गावरान कैऱ्या व गावरान आंबे विक्रिसाठी आले आहेत. मात्र यंदा अवकाळी चा फटका व प्रतिकूल हवामान यामुळे आवक कमी आहे. परिणामी भाव वाढले आहेत.



मागच्या वर्षी ५० रुपयांना पाच ते सहा कैऱ्या असलेला एक वाटा आता ८० ते शंभर रुपयांना मिळत आहे. तर पिकलेल्या गावरान आंब्याचा भाव डजनाला चारशे ते सहाशे रुपये आहे. भाव वाढले असले तरी या कैऱ्या खरेदीसाठी ग्राहक मोठी गर्दि करत आहेत.

जिल्ह्यातील बहुतांश भागांमधील आंब्यां कैऱ्या लागल्या आहेत. तर अनेक ठिकाणी कैऱ्या परिपक्व झाल्या आहेत. आदिवासी महिला, फळ व भाजी विक्रेते या कैऱ्या व आंबे घेऊन बाजारात विक्रीसाठी येत आहेत. काही ठिकाणी किलोने कैऱ्या मिळत आहेत. ताई शिद या कैरी विक्रेतीने सांगितले की माळरान व जंगलात यंदा खूपच कमी आंबे आले आहेत. अवकाळी पावसाचा फटका बसला आहे. परिणामी,यंदा कैऱ्यांचा भाव वाढला आहे. जिल्ह्यातील काही फळविक्रेत्यांकडे स्थानिक कैऱ्यांबरोबरच कर्नाटकी कैऱ्या विक्रिसाठी आल्या आहेत.

स्थानिकांना रोजगार :– जंगलात व माळरानावर मिळणाऱ्या या गावरान कैऱ्या आणि आंबे स्थानिक तसेच आदिवासी बांधव तोडून स्थानिक बाजारात विकायला आणतात. या कैऱ्या विकून स्थानिकांना विशेषतः महिलांना चांगला रोजगार देखील मिळतो.

जेवणाची लज्जत वाढवितात :– ताज्या आणि सुक्या मासळीचे कालवण, वरण यामध्ये कैऱ्या टाकल्या जातात. त्यामुळे जेवण रुचकर व लज्जतदार होते. कच्च्या कैऱ्या बारिक कापून मसाला, हळद, तेल आणि मीठ टाकुन खाल्ल्या जातात.

लोणच्यासाठी:–या कैऱ्यांचा वापर घरगुती लोणचे तयार करण्यासाठी देखील केला जातो. त्यामुळे घराघरांमध्ये लोणच्याच्या तयारीला सुरुवात झालेली दिसत आहे.


## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

मुदतवाढ सूचना

**ई निविदा सूचना क्र. ०३/२०२६-२०२७ (मुंबई) करीता**

दिनांक १३/०४/२०२६ रोजी दैनिक मुंबई चौफेर, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्याबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | महाड, पोलादपूर व रोहा औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची व सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती..... महाड, पोलादपूर व रोहा येथे बसविण्यात आलेल्या ट्रान्सफॉर्मरची किरकोळ दुरूस्तीसह तेलाची गाळणी करणे. | ₹ ११,०७,१२०.०० |

उपरोक्त कामाबाबत निविदा प्रपत्र दिनांक ११/०५/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

# डीपीएस फ्लेमिंगो तलाव क्षेत्र होणार तिप्पट

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

जैवविविधतेसाठी महत्त्वाच्या डीपीएस फ्लेमिंगो तलाव संवर्धन राखीव क्षेत्राचा विस्तार १२ हेक्टरवरून जवळपास ३६ हेक्टरपर्यंत करण्याचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात असून राज्य शासनाच्या मंजुरीची प्रतीक्षा आहे. मँग्रोव्ह सेल आणि वन विभागाने ऑक्टोबर २०२५ मध्ये सुधारित प्रस्ताव मुख्यमंत्र्यांकडे सादर केला असून ही माहिती नॅटकनेक्ट फाउंडेशनला माहिती अधिकारातून मिळाली आहे.

**अंतिम मान्यता प्रतीक्षेत**




दरम्यान, सिडकोकडून याच १२ हेक्टर तलावाचे रिअल इस्टेट प्रकल्पात रूपांतर करण्याचा प्रयत्न सुरू आहे. तलावाला "प्लॉट" म्हणून गणून प्रति हेक्टर ₹३०० कोटी या दराने तब्बल ₹३,६०० कोटींचे मूल्यांकन करण्यात आले आहे. १७ एप्रिल २०२५ रोजी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीत या प्रस्तावाला तत्त्वतः मंजुरी मिळाल्याने अंतिम शासन निर्णय लवकरच जाहीर होईल, अशी अपेक्षा पर्यावरणवाद्यांनी व्यक्त केली आहे.

नॅटकनेक्टचे संचालक बी. एन. कुमार यांनी सांगितले की, प्रस्तावाच्या प्रगतीवर माहिती अधिकाराद्वारे लक्ष ठेवले जात आहे. विस्तारित आराखड्याचे स्वागत करत त्यांनी राज्याने त्वरित अधिसूचना जारी करून या आर्द्र प्रदेशाला कायदेशीर संरक्षण द्यावे, अशी मागणी केली. त्यांच्या मते फ्लेमिंगो आणि इतर स्थलांतरित पक्ष्यांसाठी केवळ पाण्याचे अस्तित्व पुरेसे नसून खाद्य क्षेत्र, विसाव्याच्या जागा, मँग्रोव्ह आणि अबाधित भरती-ओहोटीचा परिसर तितकाच महत्त्वाचा आहे.

नवी मुंबई पर्यावरण संरक्षण संस्थेचे संदीप सरीन यांनी स्पष्ट केले की, मोठे आणि कायदेशीरदृष्ट्या संरक्षित क्षेत्र निर्माण झाल्यास व्यावसायिक हस्तक्षेपावर प्रभावी मर्यादा येतील आणि जैवविविधतेचे रक्षण होईल. नवीन भू-संदर्भित नकाशानुसार प्रस्तावित क्षेत्र ३६.८७८४ हेक्टर असून त्यात जलक्षेत्र, दाट मँग्रोव्ह, खाडी पट्टा, चिखलपट्टी आणि आसपासचा परिसर यांचा समावेश आहे. अधिकाऱ्यांच्या मते विस्तारित सीमेमुळे मँग्रोव्ह पट्टे, खाडी मार्ग आणि दलदलीचे भाग संरक्षित राहतील, ज्यामुळे पाण्याची नैसर्गिक देवाणघेवाण आणि अधिवासाची सलगता टिकून राहील. हा परिसर स्थलांतरित फ्लेमिंगो, मत्स्य प्रजनन क्षेत्रे आणि मँग्रोव्ह परिसंस्थेसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.

# नरेंद्राचार्य यांच्या रुग्णवाहिकेची अपघातग्रस्तांना तत्काळ मदत

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

साईकृपा हॉटेलसमोर कर्नाळा खिंड मुंबई-गोवा महामार्गावर टेम्पो ट्रॅव्हलर बस पलटी झाल्याने रविवारी दुपारी मोठा अपघात घडला. या अपघातात कुमार रुद्र म्हात्रे (८), रवींद्र माने (३७), प्रियांका माने (३०), विना माने (५६), नागेश कुणाल (६०), रूपा कोलारे (४४), जीत माने (३४), सदाशिव सोमने (४२), सीता माने (५५) आणि स्नेहा माने यांच्या हातापायाला, कमरेला व डोक्याला जबर मार लागून सर्व बसमधील प्रवासी गंभीर जखमी झाले.

अपघाताची माहिती मिळताच पळस्पे-कर्नाळा खिंड येथून २४ तास सेवा देणारी मोफत रुग्णवाहिका तत्काळ घटनास्थळी दाखल झाली. जगद्गुरू श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्य यांच्या प्रेरणेने सुरू असलेल्या या सेवेमार्फत जखमीस तत्काळ वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्यात आली. रुग्णवाहिकेद्वारे नानासाहेब धर्माधिकारी हॉस्पिटल, पनवेल येथे दाखल केले. वेळेवर उपचार मिळाल्यामुळे जखमींच्या प्रकृतीत सुधारणा होण्यास मदत झाली आहे.

सदर रुग्णवाहिकेचे चालक विश्वास पाटील यांनी जखमींना सुरक्षितपणे रुग्णालयात



पोहचविले. रामानंदाचार्य नरेंद्राचार्य यांच्या विनामूल्य ॲम्ब्युलन्स सेवेतून आतापर्यंत ३२,८४० अपघातग्रस्तांना वेळीच मदत करून त्यांचे प्राण वाचविण्यात आले आहेत.

जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थानची रायगडमधील ॲम्ब्युलन्स कर्नाळा खिंड, विठ्ठल कामत हॉटेलजवळ महामार्गावरील अपघातग्रस्तांच्या सेवेसाठी विनामूल्य तैनात करण्यात आली आहे. तरी सर्वांनी महामार्गावरील अपघातग्रस्तांच्या विनामूल्य सेवेसाठी ८८८८२६३०३०/ ८३२९४२५९०८ क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# विद्याभवन कॉलेजचे घवघवीत यश

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

पुणे विद्यार्थीगृहाच्या नेरुळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलातील महाविद्यालयाने मार्च २०२६ मध्ये झालेल्या उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत सायन्स शाखेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा निकाल १०० टक्के व वाणिज्य शाखेचा निकाल ८८.२३ टक्के असे घवघवीत यश प्राप्त केले आहे. विद्याभवनच्या रौप्यमहोत्सवी वर्षात निकालाची गौरवशाली यशस्वी परंपरा राखली.

प्रणय अमोल पाटील याने ८८.३३ % मिळवून विज्ञान द्विलक्षी सायन्स शाखेतून प्रथम स्थान मिळवले. श्रेया संजीव महाले आणि समृद्धी रवींद्र तवर या विद्यार्थ्यांनी ८७.६७ व ८६.५०% गुण मिळवून या शाखेतून द्वितीय आणि तृतीय स्थान पटकवले. वेदांत नामदेव मोरे या विद्यार्थ्याने ८६.६७% गुण मिळवून वाणिज्य शाखेतून प्रथम येण्याचा बहुमान मिळवला. रेन जैनाब प्रवीण मो. सौद आणि राजपुरोहित जिनल जलमसिंग या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे ८३.३३ व ८२.१७ % गुण मिळवून वाणिज्य शाखेतून द्वितीय व तृतीय स्थान मिळवले.

गौरव दिनेश मिसाळ याने ७८.१७% गुण मिळवून जनरल विज्ञान शाखेतून प्रथम येण्याचा बहुमान मिळवला. वैष्णव सुनील वायकर आणि दुर्वा मिलिंद कदम यांनी अनुक्रमे ७६.१७% आणि ७४% मिळवून द्वितीय आणि तृतीय स्थान पटकवले. पुणे विद्यार्थी गृह कार्याध्यक्ष राजेंद्र बोऱ्हाडे, उपकार्याध्यक्ष सुभाष जिर्गे, अमोल जोशी, कार्यवाह संजय गुंजाळ, कोषाध्यक्ष कृष्णाजी कुलकर्णी, कुलसचिव दिनेश मिसाळ, सर्व संस्था पदाधिकारी व संचालक मंडळ तसेच शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकांनी या यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# रसायनीत बुद्ध जयंती आणि महापुरुषांचा संयुक्त जयंती महोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात साजरा

**मोहोपाडा : वार्ताहर**
**रसायनी : वार्ताहर**

'जगाला युद्ध नको, बुद्ध हवा' हा शांततेचा संदेश घेऊन सम्यक सामाजिक संस्था, रसायनी यांच्या वतीने विश्ववंदनीय तथागत सिद्धार्थ गौतम बुद्ध आणि थोर महापुरुषांच्या संयुक्त जयंती महोत्सवाचे मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आले होते. हा सोहळा १ मे रोजी रिस आणि रसायनी परिसरात संपन्न झाला असून, यानिमित्त विविध सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल रंगली होती.

जयंती महोत्सवामध्ये छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा जोतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अण्णा भाऊ साठे, संत गाडगेबाबा, अहिल्यादेवी



होळकर, सावित्रीबाई फुले आणि रमाई आंबेडकर यांसारख्या युगपुरुषांच्या आणि क्रांतीज्योतींच्या विचारांना वंदन करून दिवसभराचे नियोजित कार्यक्रम करण्यात आले.

सायंकाळच्या सत्रात लहान मुलांसाठी वक्तृत्व स्पर्धा, मान्यवरांचे मार्गदर्शन आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा तसेच भीम-बुद्ध स्वरांजली हा सुश्राव्य संगीताचा कार्यक्रम रात्री जल्लोषात पार पडला.

महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी सम्यक सामाजिक संस्थेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी मेहनत घेतली. हा उत्सव केवळ एक सोहळा नसून सामाजिक ऐक्य आणि समतेचा संदेश देणारे व्यासपीठ आहे, असे आयोजकांच्या वतीने सांगण्यात आले.

# महिलेचा संशयास्पद मृतदेह आढळला

**पनवेल : वार्ताहर**

तालुक्यातील बंबई पाडा परिसरात रविवारी सकाळी एका महिलेचा संशयास्पद मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. अज्ञात कारणावरून महिलेचा गळा आवळून खून केल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात असून, परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

बंबई पाडा येथील रहिवाशांना सकाळच्या सुमारास संबंधित महिला घरात मृतावस्थेत आढळून आली. तिच्या गळ्यावर आढळलेल्या खुणांवरून हा खून गळा आवळून करण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. घटनेची माहिती मिळताच नागरिकांनी तत्काळ पोलिसांना कळवले. घटनास्थळी पोलीस पथक दाखल होऊन पंचनामा करण्यात आला असून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. या प्रकरणातील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी वैयक्तिक वाद, कौटुंबिक कारण किंवा इतर कोणता गुन्हेगारी हेतू याबाबत पोलीस सर्व बाजूंनी तपास करीत आहेत. परिसरातील नागरिकांकडूनही चौकशी सुरू असून सीसीटीव्ही फुटेज आणि इतर तांत्रिक पुराव्यांच्या आधारे आरोपींचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

# तुकाराम हरी वाजेकर विद्यालयाची दमदार कामगिरी

**उरण : प्रतिनिधी**

फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयाने इयत्ता १२ वी बोर्ड परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयाचा एकूण निकाल ९६.६८% इतका लागला असून विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरीची नोंद केली आहे. शाखानिहाय निकालात वाणिज्य शाखेने ९७.९७% निकाल, विज्ञान शाखा ९६.३६% आणि कला शाखा ९४.९३% निकालासह उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

विज्ञान शाखेत ठाकूर निमिष घनश्याम याने ८३.६७% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. शरणागत कार्तिका ज्ञानदेव (७८.५०%) हिने द्वितीय तर शिंदे स्नेहल रावसाहेब (७०.३३%) हिने तृतीय क्रमांक मिळवला. वाणिज्य शाखेत प्रगती महेंद्र विश्वकर्मा हिने ७८.१७% गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला. पूर्वा यशवंत भोईर (७६.६७%) हिने द्वितीय तर कृतिका रवींद्र ठाकूर (७५.३३%) हिने तृतीय क्रमांक पटकावला.

कला शाखेत भगत लक्ष्मी जगन्नाथ हिने ८४.००% गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला. साहू आंचल केसर (७५.५०%) हिने द्वितीय तर ससाणे सिद्धिका लक्ष्मण (७५.१७%) हिने तृतीय क्रमांक मिळवला. या यशामागे विद्यार्थ्यांचे परिश्रम, शिक्षकांचे मार्गदर्शन व पालकांचे सहकार्य महत्त्वाचे ठरले आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, पालकांचे व शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत असून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

याप्रसंगी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य सुधीर घरत, स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन कृष्णा कडू व सर्व सदस्य, प्राचार्य बबन साळुंखे, उपमुख्याध्यापिका संगीता थोरात, पर्यवेक्षिका सुप्रिया पाटील, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर तसेच दि रयत सेवक को. ऑप. बँकेचे संचालक व शाखा समितीचे चेअरमन वाशी प्रा. किशोर पाटील, ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख प्रा. बाबूलाल पाटोळे, सायन्स विभागप्रमुख प्रा. झुंझार माने, कॉमर्स विभाग प्रमुख प्रा. ऋषिकेश धुरी, कार्यालयीन प्रमुख नितीन म्हात्रे, नवनीत ठाकूर तसेच माजी विद्यार्थी संघटना, फुंडे तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# अपघातात सहा महिन्यांच्या बाळाचा मृत्यू

**नवीन पनवेल : वार्ताहर**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर रस्ता ओलांडताना एका कारने २४ वर्षीय महिलेला धडक दिली. ही महिला बाळाला घेऊन रस्ता क्रॉस करत होती. या अपघातात बाळ आणि आई गंभीर जखमी झाले. जखमी बाळाला रुग्णालयात दाखल केले असता सहा महिन्यांच्या बाळाचा मृत्यू झाला. या अपघाताची नोंद खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.




१ मे रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास संकेत बळवंत चव्हाण (राहणार अंधेरी) हे आणि त्यांचे मालक क्रेटा कार क्रमांक एमएच ०२ एफ जे ८५४८ मधून पुणे मुंबई लेनवरील मिसिंग लिंक उद्घाटन कार्यक्रमावरून मुंबईला जाताना पुणे-मुंबई लेनवर आदई गाव, नवीन पनवेल या ठिकाणी आले. यावेळी सुवर्णा शंकर काळे (वय २४, रा. आदई गाव) ही महिला द्रुतगती महामार्गावर पुणे-मुंबई लेनवरून मुंबई-पुणे लेनकडे बाळाला घेऊन रस्ता क्रॉस करीत होती.

यावेळी तिची क्रेटा कारला जोरदार धडक बसली आणि झालेल्या अपघातात सुवर्णा काळे आणि तिचे सहा महिन्यांचे बाळ गंभीर जखमी झाले होते.

या दोघांनाही कामोठे येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी बाळाला मृत घोषित केले. या अपघातात कारचेदेखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

# कौटुंबिक वादातून इसम बेपत्ता

**पनवेल : वार्ताहर**

कौटुंबिक वादातून एक इसम राहत्या घरातून कोठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. हरीषचंद्र बाळू कोळी (वय ६५ वर्षे, रा. कलश हील, रूम नं १०६, से.०३, प्लॉट नं. ४३, ता. पनवेल) उंची ५.५ फूट अंदाजे, बांधा मध्यम, रंग सावळा, चेहरा सरळ, केस पांढरे काळे, अंगात निळ्या रंगाचा शर्ट व खाकी रंगाची पॅन्ट परिधान केलेला, मराठी, हिंदी बोलणारा अशा वर्णनाचा इसम आहे. याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पो. हवा. अतुल देवकर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# कष्टाच्या इंधनाने प्रगतीचा टॉप गिअर

## कळंबोलीत रिक्षाचालकाच्या मुलाची सुवर्णभरारी

**कळंबोली : बातमीदार**

आईवडिलांनी केलेल्या काबाडकष्टाचे चीज करीत कळंबोलीतील रिक्षाचालकाच्या मुलाने बारावीच्या परीक्षेत ८७ टक्के गुण प्राप्त करून प्रथम येण्याचा बहुमान पटकावला आहे. कळंबोलीत गेल्या १२ वर्षापासून रिक्षा चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या दिलीप पांडुरंग चव्हाण यांच्या वैभव चव्हाण या मुलाने सुधागड विद्या संकुलात मराठी माध्यमात शिक्षण घेऊन ८७ टक्के गुण प्राप्त करून वडिलांच्या कष्टाचे चीज करून सुवर्णभरारी घेतली आहे.

याच वैभवने दहावीच्या परीक्षेमध्येसुद्धा ९५ टक्के गुण मिळवून सुधागड विद्या संकुलात पहिला येण्याचा बहुमान पटकावला होता. वैभवने मिळवलेल्या या देदीप्यमान यशाने या रिक्षाचालकांच्या कुटुंबांचे पारणे फेडले आहे. त्यांच्या कुटुंबात आनंदाचा पारावार शिगेला पोहोचला आहे. आपण केलेल्या कष्टाचे चीज झाले आहे आणि



आता त्याला आयआयटीमधून इंजिनिअरिंग क्षेत्रात चमकदार कामगिरी करावयाची आहे, असे वैभव चव्हाणचे वडील दिलीप चव्हाण यांनी सांगितले आहे. या गुणवंत विद्यार्थ्याचे सुधागड विद्या संकुलाचे प्राचार्य राजेंद्र पालवे यांनी दूरध्वनीवरून अभिनंदन केले आहे.

कळंबोलीतील सुधागड विद्या संकुल हे शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये यांच्या प्रेरणेनुसार या शिका मोठे व्हा, या तत्त्वाने काम करीत आहे. तळागाळातील शेतकरी, शेतमजूर, माथाडी कामगार, रिक्षाचालक, भाजी विक्रेत्यांची मुले सर्वाधिक करून या विद्यालयात शिक्षण घेऊन आपले आयुष्य घडवत आहेत. या विद्या संकुलात मराठी, इंग्रजी, हिंदी, उर्दू या चार भाषांतून शिक्षण दिले जाते. विद्यालयात सर्वांना मुक्त प्रवेश दिला जातो. दहावीच्या परीक्षेत विद्यालयातील इंग्रजी मराठी व हिंदी माध्यमातून दहावीच्या विद्यार्थ्यांनी चांगले गुण प्राप्त करून विद्यालयाचे नाव शैक्षणिक पातळीवर चमकले आहे.

याच विद्यालयात मराठी माध्यममध्ये शिकणाऱ्या वैभव दिलीप चव्हाण या विद्यार्थ्याने कुटुंबाची परिस्थिती बेताची असताना आणि वडील आपले रिक्षाचालक असल्याची जाणीव मनात उराशी बाळगून मेहनतीच्या जोरावर त्यांनी बारावीच्या परीक्षेत ८७ टक्के गुण मिळवून सुधागड विद्या संकुलात प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. वैभवने मेहनत करून परिस्थितीवर मात करून शैक्षणिक भरारी घेतल्याने त्याच्या गुरसाळे गावांमध्येही ग्रामस्थांनी जल्लोष व आनंदोत्सव साजरा केला आहे. त्याच्या आजी आजोबा व काकांनी व ग्रामस्थांनी त्यांचे पेढे भरून कौतुक व शाबासकीची थाप दिली आहे. विद्यालयातील त्याचे शिक्षक मनीषा गायकवाड व जितेंद्र पवार यांनी त्याच्या गुणवत्तेकडे अधिक लक्ष दिल्याचे यावेळी सांगण्यात आले.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा होईल याकडे शिक्षक, संस्था लक्ष देत आहे.सजग विद्यार्थी घडवण्याचे काम विद्या संकुलाकडून केले जात असल्याचे विद्या संकुलाचे प्राचार्य राजेंद्र पालवे यांनी सांगितले.

# केजीपी संचलित शाळांचा १०० टक्के निकाल

**पनवेल : वार्ताहर**

कमल गौरी हिरु पाटील शिक्षण संस्था (केजीपी) संचलित दोन्ही शाळांचा १२ वीचा निकाल १००% लागला. कमल गौरी हिरु पाटील शिक्षण संस्था (केजीपी) संचलित दि. इलाईट पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज व बीके पाटील ज्युनिअर कॉलेजचा बारावीचा निकाल १०० टक्के लागला. सर्व विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे संस्थेचे चेअरमन बबनदादा पाटील यांनी अभिनंदन केले आहे.

# हरेश उतेकर राष्ट्रवादी काँग्रेसच्या रसायनी विभागीय अध्यक्षपदी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी परिसरात युवा उद्योजक म्हणून अल्पावधीतच स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारे हरेश उतेकर यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या रसायनी विभागीय अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे रसायनी परिसरात राष्ट्रवादी काँग्रेसला नवी ऊर्जा मिळेल, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

मोहोपाडा येथील जनता विद्यालयात खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते विविध विकासकामांच्या लोकार्पण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या भव्य कार्यक्रमात खालापूर तालुक्यातील दीडशेहून अधिक कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. याचवेळी खासदार तटकरे यांच्या हस्ते हरेश उतेकर यांना रसायनी



विभागीय अध्यक्षपदाचे नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

हरेश उतेकर हे रसायनी परिसरात झपाट्याने पुढे आलेले एक यशस्वी नाव आहे. व्यावसायिक क्षेत्रात यशस्वी वाटचाल करत ते सामाजिक बांधिलकी जपत तळागाळातील गोरगरीब, सर्वसामान्य नागरिक आणि गरजू लोकांच्या मदतीसाठी नेहमीच तत्पर असतात. त्यांच्या या सेवाभावी कार्यामुळे त्यांनी अल्पावधीतच परिसरातील जनतेचा विश्वास संपादन केला आहे.

नियुक्तीची घोषणा होताच रसायनी परिसरात हरेश उतेकर यांच्या समर्थकांनी जोरदार जल्लोष साजरा केला. फटाक्यांची आतषबाजी करत आणि एकमेकांना मिठाई वाटून कार्यकर्त्यांनी आपला आनंद व्यक्त केला. अनेक सामाजिक, राजकीय व व्यावसायिक क्षेत्रातील मान्यवरांनी हरेश उतेकर यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# जिल्ह्यात एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असल्याने तांत्रिक शिक्षणाची आवश्यकता

## खासदार तटकरेंचे प्रतिपादन ; नांदगाव हायस्कूलमधील तीन वर्गखोल्यांचे लोकार्पण




**मुरुड : प्रतिनिधी**

शिक्षणासाठी किमान सुविधा प्राप्त करून देणे हे प्रत्येकाचे नैतिक कर्तव्य आहे .परंतु शिक्षणाबरोबरच तंत्रउचशिक्षण सुद्धा विद्यार्थ्यांनी घेणे खूप आवश्यक आहे .

लवकरच रायगड जिल्ह्यात एक लाख कोटीची गुंतवणूक होणार आहे .तसेच साळाव येथे जिंदाल कंपनीकडून आठ हजार कोटी रुपयांचा अतिरिक्त गुंतवणूक होणार असून कंपनीने याबाबत हालचाली सुरु केल्या असून जिल्ह्यात येणारे नवीन प्रकल्पसाठी तंत्रउचशिक्षण खूप आवश्यक बाब असून रायगड जिल्ह्यातील तरुणांना नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध होणार आहेत .यासाठी विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल करण्यासाठी विविध संस्था चालकांनी विविध कोर्से शिकवण्यासाठी तांत्रिक शाखा कश्या निर्माण होतील याकडे लक्ष देणे आवश्यक असून यासाठी संस्था चालकांना सर्वोतोपरी सहकार्य करू असे अभिवचन यावेळी खासदार सुनील तटकरे यांनी दिले .

श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतनगर नांदगाव येथील खासदार निधीमधून व गेल कंपनीच्या सी एस आर फंडामधून तीन वर्ग खोल्या बांधण्यात येऊन त्याचा लोकार्पण सोहळ्या प्रसंगी खासदार तटकरे आपल्या भाषणात बोलत होते .

या कार्यक्रम प्रसंगी सहजीवन विद्यामंडळाचे अध्यक्ष फैरोज घलटे, संचालक ॲड इस्माईल घोले, चिंतामणी जोशी, गणेश गाणार , कृष्णा अंबाजी, अस्लम हलडे , अरविंद भंडारी, मुश्ताक झोंबाडकर , किसन भेर्ले , राष्ट्रवादी जिल्हा उपाध्यक्ष मंगेश दांडेकर नगरसेवक मनोज भगत, माजी सभापती स्मिता खेडेकर, अशिका ठाकूर मुरुड तालुका महिला अध्यक्ष ॲड मृणाल खोत सचिव विजय पैर आगरदांडा सरपंच आशिष हेदुलकर माजी सरपंच अजित कासार मुरुड शहर अध्यक्ष संजय गुंजाळ , मुख्याध्यापक अर्चना खोत, पर्यवेक्षक प्रतीक पेडणेकर आदी मान्यवर उपस्थित होते

यावेळी खासदार तटकरे यांच्या शुभ हस्ते वर्ग खोल्यांची फीत उद्धघाटन करण्यात आले .यावेळी खासदार सुनील तटकरे आपल्या भाषणात म्हणाले, कि विविध उद्योगपती यांच्याशी चर्चा करून कंपनीस जे आवश्यक कोर्से आहेत. त्याची माहिती घेऊन कौशल्य आधारित कोर्से सुरु करण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# गोरेगाव येथे अमानुष घटनेनंतर संभाजी ब्रिगेडकडून पीडित कुटुंबाची भेट



**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील गोरेगाव ,ता. माणगाव येथे घडलेल्या अमानुष अत्याचार व हत्या प्रकरणामुळे परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या पार्श्वभूमीवर संभाजी ब्रिगेड रायगड जिल्ह्याच्या वतीने पीडित महिला पल्लवी मोरे यांच्या राहत्या घरी भेट देऊन कुटुंबीयांचे सांत्वन करण्यात आले.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे रायगड जिल्हाध्यक्ष शिवश्री वैभव सुर्वे, जिल्हा उपाध्यक्ष सिद्धार्थ गायकवाड, जिल्हा कार्याध्यक्ष अशोक धामणसे तसेच आरपीआय श्रीवर्धन तालुका अध्यक्ष विलास चाफे, कोमल गायकवाड, पुई गावचे उपसरपंच ऋषिकेश दळवी यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

पदाधिकाऱ्यांनी कुटुंबीयांकडून संपूर्ण घटनेची माहिती घेतली व प्रकरणाची सखोल शहानिशा केली. तसेच पीडित कुटुंबाला न्याय मिळेपर्यंत त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचा विश्वास देत आर्थिक मदतही करण्यात आली.

यानंतर संबंधित परिसरातील पोलीस चौकीत जाऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली. या प्रकरणाची सखोल तपासणी करून आरोपीला तात्काळ अटक करण्यात यावी, तसेच प्रकरण फास्टट्रॅक न्यायालयात चालवून दोषीला कठोरात कठोर शिक्षा देण्यात यावी, अशी ठाम मागणी करण्यात आली.

या वेळी अप्पर पोलिस अध्यक्ष अधिकारी अभिजीत शिवतरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक बेलदरे यांच्यासह विविध सामाजिक व राजकीय क्षेत्रातील बहुजन समाजाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संभाजी ब्रिगेडने या प्रकरणात न्याय मिळवून देण्यासाठी शेवटपर्यंत लढा देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

# नज हायस्कूलचा हर्षद तावरी मुरूड तालुक्यात ९३.६७ टक्के मिळवून प्रथम

**मुरुड : प्रतिनिधी**

माजगाव येथील नज हायस्कुलच्या वाणिज्य शाखेच्या हर्षद अशोक तावरी तालुक्यात प्रथम ९३.६७ गुण मिळवलेमहाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या बारावी परीक्षेचा निकाल मुरूड अंजुमन इस्लाम जंजिरा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयचा आज जाहीर झाला आसुन या मध्ये दरवर्षीप्रमाणे यंदाही निकालात मुलींनीच बाजी मारली आहे.

विज्ञान शाखा १०० टक्के लागला असुन प्रथम क्रमांक इर्तझा इम्तियाज गोलंदाज हीला ७९.६७ टक्के पडले तर व्दितीय क्रमांक –आलिया वसीम उलडे हीला ७८.५ टक्के, तृतीय क्रमांक सहर ए. रहमान अदमाने हीला७६.०० टक्के मिळाले. कला शाखा ८५ टक्के लागला असुन या मध्ये वेदांती योगेश केने हिला ८२.१७ टक्के पडले तर व्दितीय क्रमांक खालीद शकील इद्रूस याला टक्के पडले.तृतीय क्रमांक तहमीना इम्तियाज हुरझुकहिला ६०.५० टक्के मिळाले.यावेळी प्राचार्य यांनी विद्यार्थीचं कौतुक करुन पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

मुरूड सर एस. ए. हायस्कूल व स्व.म.ल.दांडेकर कनिष्ठ महाविद्यालय कला शाखा ७१.६४ टक्के,वाणिज्य शाखा ८५.७१ टक्के ,बँकिंग शाखा ८८.८८ टक्के. मुरूड सर एस. ए. हायस्कूल व स्व. म. ल. दांडेकर कनिष्ठ महाविद्यालयकला शाखा ६७ पैकी ४८ पास ७१.६४ टक्के प्रथम श्रेयस श्रीकांत वारगे ७०.०५ टक्के द्वितीय इशा कृष्णा कासारे ६८.३३ टक्के तृतीय शुभम जगदीश गायकर ५६.८३ टक्के वाणिज्य शाखा ८५ .७१ टक्के प्रथम रुद्राणी हेरंब जोशी ७१.१७ टक्के द्वितीय पार्थ उमेश चिंदरकर ६८.३३ टक्केतृतीय नियती नरेश पाटील ६७.८३ टक्के ८ पास ८८.८८ टक्के लागला.

# मुरूडच्या अंजुमन इस्लाम जंजिरा हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेचे १००% यश



**मुरुड : प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम जंजिरा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय मुरुड जंजिरा येथील फेब्रुवारी २०२६ मध्ये झालेल्या बारावी (उच्च माध्यमिक) परीक्षेत विज्ञान शाखेने १०० टक्के यश मिळवत उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे.

महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेत एकूण ८८ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून ४ विद्यार्थ्यांनी विशेष प्रावीण्य मिळवले आहे. तसेच २८ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी, ५० विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणी आणि ६ विद्यार्थ्यांनी उत्तीर्ण श्रेणीत यश संपादन केले. या शाखेत गोलंदाज इर्तजा इम्तियाज (४७८ गुण, ७९.६७%) हिने प्रथम क्रमांक पटकावला. उलडे आलिया वसीम (४७१ गुण, ७८.५०%) हिने द्वितीय, तर अदमाने सहेर अ. रहमान (४५६ गुण, ७६.००%) हिने तृतीय क्रमांक मिळवला.

कला शाखेचा निकाल ८५ टक्के लागला आहे. त्यापैकी १ विद्यार्थ्याने विशेष प्रावीण्य, २ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी, १७ विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणी, तर १४ विद्यार्थ्यांनी उत्तीर्ण श्रेणी मिळवली. या शाखेत केने वेदांती योगेश (४९३ गुण, ८२.१७%) हिने प्रथम क्रमांक मिळवला. इद्रूस खुलूद शकील (४२६ गुण, ७१.००%) हिने द्वितीय, तर हुर्जुक तहमीना इम्तियाज (३६३ गुण, ६०.५०%) हिने तृतीय क्रमांक पटकावला.

या दोन्ही शाखांमध्ये पहिल्या तीन क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव संस्थेचे सचिव हिफझूरेहमान नझीरी, स्कूल चेअरमन अब्दुल रहीम कबले, सदस्य तौसिफ़ फत्ते व महाविद्यालयाचे प्राचार्य वसिमुलहक सातारेकर, अंजुमन डिग्री कॉलेज चे प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या हस्ते करण्यात आला.या यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# माणगाव एस.एस. निकम इंग्लिश ज्युनिअर कॉलेजचा बारावीचा निकाल १०० टक्के ; मंथन फराडे प्रथम



**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक मंडळातर्फे फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या बारावी परीक्षेचा निकाल शनिवार दि.२ मे २०२६ रोजी ऑनलाईन जाहीर झाला. या परीक्षेत माणगाव येथील माणगाव एजुकेशन ट्रस्ट माणगाव संचालित एस.एस.निकम इंग्लिश ज्युनिअर कॉलेज माणगावने आपल्या उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे. या ज्युनिअर सायन्स कॉलेजचा बारावी परीक्षेचा एकूण निकाल १०० टक्के लागला असून कु.मंथन अरुण फराडे या विद्यार्थ्याने ८५.८३ टक्के इतके गुण संपादन करून कॉलेजमध्ये सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान मिळविला आहे.

या कॉलेजमधून कु. इमाद फरिद अहमद सनगे या विद्यार्थिनींने ७७ टक्के इतके गुण संपादन करून द्वितीय क्रमांक,कु. इफ़रा निजार खान या विद्यार्थिनीने ७४.६७ टक्के इतके गुण संपादन करून तृतीय क्रमांक,कु.श्रावणी प्रफुल्ला गवळी या विद्यार्थिनीने ७४.३३ टक्के इतके गुण संपादन करून चतुर्थ क्रमांक तर कु.अरिबा अब्दुल बासित सनगे या विद्यार्थिनीने ७३.३३ टक्के इतके गुण संपादन करून अनुक्रमे पाचवा क्रमांक पटकावत यश संपादन केले. या कॉलेजमधून यावर्षी बारावी परीक्षेसाठी एकूण ४० विद्यार्थी बसले होते. हे सर्व विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत. त्यापैकी विशेष श्रेणीत २ विद्यार्थी,प्रथम श्रेणीत १८ तर २० विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. या कॉलेजचा दरवर्षी निकाल उंचावत असल्याने पालकवर्गांमधे तसेच विद्यार्थ्यांमध्ये विशेष आनंदाचे वातावरण आहे. विद्यार्थ्यांची जिद्द,शिक्षकांचे अथक परिश्रम आणि पालकांचे सहकार्य या त्रिसूत्रीमुळेच हे यश साध्य झाले आहे," असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. संगीता कोकाटे यांनी केले. या यशाबद्दल संपूर्ण माणगाव परिसरातून शाळेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे माणगाव एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष डॉ.मदन निकम,संस्थेचे सर्व पदाधिकारी तसेच प्राचार्या डॉ. संगीता कोकाटे ,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष अभिनंदन केले

# नागोठणे 'भाएसो'चा शास्त्र शाखेचा ९७.२२% निकाल

**नागोठणे : प्रतिनिधी**

नागोठणे येथील भारतीय एज्युकेशन सोसायटीच्या एस. डी. परमार इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजने इयत्ता १२ वी (एच.एस.सी.) शास्त्र शाखेच्या मार्च/एप्रिल २०२६ परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी करत ९७.२२ टक्के निकाल नोंदविला आहे. या उज्ज्वल यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण असून पालकवर्गात समाधान व्यक्त करण्यात आले आहे.

या परीक्षेत कुमारी सौमिली भुनीया हिने ८२.३३ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. कुमार रीतविक वुरीति याने ७९.३३ टक्के गुण मिळवून द्वितीय, तर कुमार देवांश लवटे याने ७७ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला.

या उल्लेखनीय निकालाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष किशोरभाई जैन, सुरेश जैन, कार्तिक जैन तसेच मुख्याध्यापिका, शिक्षकवर्ग आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# तटकरे ग्रुपच्या जीटीडी फ्युचर स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज वरसगावचा एचएससी निकाल १०० टक्के

## उल्लेखनीय कामगिरी ; सर्व ६९ विद्यार्थी प्रथम श्रेणीत

**रोहा : प्रतिनिधी**

वरसगाव येथील GDT फ्युचर स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजने इयत्ता बारावी (एचएससी) परीक्षा २०२५–२६ मध्ये १०० टक्के निकालाची उज्ज्वल परंपरा कायम राखत अभिमानास्पद यश संपादन केले आहे.

महाविद्यालयातील सर्व ६९ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होत उत्कृष्ट कामगिरी केली आहे.या यशामागे विद्यार्थ्यांची सातत्यपूर्ण मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि संस्थेचा एकत्रित प्रयत्न यांचा मोठा वाटा आहे.

निकालात अव्वल ठरलेले विद्यार्थी पुढीलप्रमाणे :

प्रथम क्रमांक : निहार पाताडे ८४.१७%

द्वितीय क्रमांक : श्रेया ठाकूर ८३.६७% व श्रावणी साळवी ८३.६७%

तृतीय क्रमांक : तन्वी देशमुख ८३.१७% व अर्चिता वार्गुडे ८३.१७%

एकूण निकालात १५ विद्यार्थ्यांनी ८०% पेक्षा जास्त गुण मिळवले, ३४ विद्यार्थ्यांनी ७५ ते ८०% दरम्यान गुण मिळवले, १५ विद्यार्थ्यांनी ७० ते ७५% दरम्यान गुण मिळवले, तर ५ विद्यार्थ्यांनी ६०% पेक्षा जास्त गुण मिळवले आहेत.

विषयवार गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजीमध्ये श्रावणी साळवी (८३), भौतिकशास्त्रात श्रावणी वैद्य व पूजा शिंदे (८९), रसायनशास्त्रात निहार पाताडे (८९), जीवशास्त्रात श्रुती झोपे (९६), गणितात निहार पाताडे (८६), भूगोलात आर्यन बाईत (८७) आणि माहिती तंत्रज्ञानात अर्चिता वारगुडे (९९) यांनी विशेष यश मिळवले.

या यशाबद्दल तटकरे ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे अध्यक्ष श्री. संदीप तटकरे व संपूर्ण मॅनेजमेंट यांनी सर्व विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे आणि पालकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

"विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचा विश्वास या त्रिसूत्रीमुळेच हा यशस्वी निकाल शक्य झाला आहे असे म्हणून सर्व विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

महाविद्यालयाच्या प्राचार्या योगिनी देशमुख यांनी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# तळा तालुक्याचा निकाल ९६.६९ टक्के; श्रावणी शिंदे तालुक्यात प्रथम

**तळा : प्रतिनिधी**

उच्च माध्यमिक शालांत परीक्षेचा २०२६चा १२ वी चा ऑनलाईन निकाल २ मे २०२६ रोजी जाहीर झाला असून या परीक्षेसाठी तळा तालुक्यातून २१२ विद्यार्थी बसले होते.त्यापैकी २०५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. एकूण निकाल ९६.६९% लागला आहे.

या परीक्षेत तालुक्यात विज्ञान शाखेची विद्यार्थीनी अनुष्का उत्तरेश्वर सातपुते व भुमीका प्रकाश चौधरी ७८.६७%गुण मिळवून विज्ञान शाखेत प्रथम, सृष्टी दिपक काळे ७१.५०%गुण मिळवून द्वितीय, तर शर्वरी जगदीश शिंदे६७.६७%गुण मिळवून तृतीय आली आहे.

तर वाणिज्य शाखेत श्रावणी दिलीप शिंदे ८४.१७% गुण मिळवून प्रथम, सोनल संतोष अडखळे ७७.००% गुण मिळवून द्वितीय तर मंथन धनाजी मासक ७५.५०% गुण मिळवून तृतीय आला आहे.

कला शाखेत रोहीत संदिप माळी हा विद्यार्थी ६७.५०%गुण मिळवून प्रथम तर भावेश अमित आर्डे ६६.१७% गुण मिळवून द्वितीय व श्रेया गोविंद गोळे ६५.५०% गुण मिळवून तृतीय आली आहे.

तालुक्यात वाणिज्य शाखेची श्रावणी दिलीप शिंदे या विद्यार्थीनीने ८४.१७%गुण मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान मिळविला आहे.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाकडून व सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# माणगावच्या साबळे कनिष्ठ महाविद्यालयाचे बारावी परीक्षेत नेत्रदीपक यश

## विज्ञान शाखा ९९.६१%, वाणिज्य शाखा ९२.६६% तर कला शाखेचा ६१.२९% निकाल

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या इयत्ता बारावी परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून विज्ञान,वाणिज्य आणि कला या तिन्ही शाखांमध्ये विद्यार्थ्यांनी समाधानकारक आणि उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे. विद्यार्थ्यांच्या मेहनतीसोबतच शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचा पाठिंबा यामुळे हा यशस्वी निकाल लागल्याची भावना व्यक्त होत आहे.

विज्ञान शाखेत सई विभावरी विठोबा शिंदे हिने ७४.१७ टक्के गुण मिळवत आघाडी घेतली. तिच्या पाठोपाठ सुमित रंजना जयशंकर पांडेय (७२.५०%), सौम्या प्राप्ती मंदार मोरे (७२.१७%), श्रावणी प्रणित परशुराम नलावडे (६९%) आणि आदिती अस्मिता आबासाहेब पाटणकर (६८.५०%) यांनी उत्तम यश संपादन केले. या विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण अभ्यास आणि आत्मविश्वासाच्या जोरावर हे यश मिळवले असून विज्ञान शाखेचा एकूण निकाल ९९.६१ टक्के लागला आहे. वाणिज्य शाखेत धर्मेद्रपाल पुनीदेवी मांगीलाल चौधरी यांनी ७१.३३% गुणांसह प्रथम स्थान पटकावले. शुभ्रा सुरेखा खेळू बागवे (६५.००%), रिया तनुजा तुकाराम करकरे (६४.१७%), अनुष्का गुलाब गोरख साने (६३.१७%) आणि श्रद्धा विद्या विश्वास इप्ते (६१.५०%) यांनीही चांगली कामगिरी करत महाविद्यालयाचा गौरव वाढवला. या शाखेचा निकाल ९२.६६ टक्के लागला आहे. कला शाखेत मानसी शुभांगी संतोष माने हिने ६४.५०% गुणांसह अव्वल स्थान मिळवले. किरण पुष्पा कृष्णा शिर्के (६१.५०%),प्रगती प्रियंका पांडुरंग मोरे (६०.१७%),कावेरी कविता शंकर पोटले (५८.८३%) आणि शुभम दक्षता दिलीप जाधव (५७.६७%) यांनीही यशस्वी या वाटचाल करत आपल्या कर्तृत्वाची छाप उमटवली. या शाखेचा निकाल ६१.२९ टक्के असा लागला आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षकवर्ग संस्थेचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे,सेक्रेटरी कृष्णा भाई गांधी, संस्थेचे सर्व पदाधिकारी व सभासद,चेअरमन नरेंद्र गायकवाड,शिपूरकर व वाघेरे स्कुल कमिटी चेअरमन अरुण पवार,सदस्य नितीन बामगुडे, मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे सीबीएसई इंग्रजी शाळेच्या चेअरमन निकीता साबळे विधी महाविद्यालयाचे चेअरमन ॲड. विनोद घायाळ,नर्सिंग कॉलेजचे चेअरमन डॉ.गौतम राऊत,डॉ.आबासाहेब पाटणकर,प्राचार्य आर.एच. पाटील,उपप्राचार्य भानुदास बिरादार सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# वाहतूक शाखेतील सहा कर्मचाऱ्यांना पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह



**चौक : प्रतिनिधी**

महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून वाहतूक शाखेतील सहा पोलीस यांना पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह (DG insignia) देऊन गौरविण्यात आल्याने वाहतूक शाखेत मानाचा तुरा खोवला गेला आहे, हा सहाही पोलिसांचे कौतुक होत असून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

६७ वा महाराष्ट्र स्थापना दिवशी सहा. पोलीस उप निरीक्षक मनोज चौधरी, पो.हवा. विनोद भोईर,पो.हवा. निलेश चव्हाण, पो.हवा. सचिन पवार, पो.हवा. अमित परदेशी, पो.हवा. किरण महाजन यांना पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह प्रदान करून त्यांचा सन्मान करण्यात आला. त्यांच्या प्रदिर्घ सेवेत शिस्तबद्ध व प्रामाणिकपणे काम केले असुन महामार्ग पोलीस येथे देखील काम करीत असताना अपघातांच्या अनेक घटनांमध्ये अपघातग्रस्तांना मदत करुन अनेकांचे जीव वाचवण्याचे काम त्यांनी केले आहे.

# सीएसकेचा विजयी चौकार

## मुंबईच्या प्लेऑफचे समीकरण झाले खडतर

**चेन्नई : वृत्तसंस्था**

कर्णधार ऋतुराज गायकवाड आणि आयपीएलच्या इतिहासातील महागडा अनकॅप्ड खेळाडू कार्तिक शर्माच्या नाबाद अर्धशतकाच्या जोरावर चेन्नई सुपर किंग्सच्या संघाने चेपॉकच्या मैदानात मुंबई इंडियन्सला आठ विकेट्स राखून पराभूत केले. या विजयासह चेन्नई संघाने प्लेऑफच्या शर्यतीत आपली दावेदारी कायम ठेवली आहे.

दुसरीकडे यंदाच्या हंगामातील नऊ सामन्यातील सातव्या पराभवासह मुंबई इंडियन्सच्या संघाने स्वबळावर प्लेऑफचे तिकीट मिळवण्याची संधी गमावली आहे. आता मुंबईच्या संघाने उर्वरित सर्व सामने जिंकले तरी स्पर्धेत टिकून राहण्याचे त्यांचे भवितव्य हे इतर संघाच्या निकालावर अवलंबून असेल.

चेपॉकच्या मैदानात हार्दिक पांड्याने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. अंशुल कंबोज याने सलामीवीर विल जॅक्सला



अवघ्या एक धावावेर बाद करत मुंबई इंडियन्सला पहिला धक्का दिला. रायन रिकल्टन आणि नमन धीर यांनी संघाचा डाव सावरत ३२ चेंडूत ५२ धावांची भागीदारी रचली, पण नूर अहमदने ही जोडी फोडली. रिकल्टन २४ चेंडूत ३७ धावांवर उर्विल पेटलच्या हाती झेल देऊन परतला. नमनने ३७ चेंडूत केलेल्या ५७ धावा आणि सूर्यकुमार यादवने चांगली सुरुवात केल्यावर १२ चेंडूत २१ धावांवर तंबूचा रस्ता धरल्यावर तळाच्या फलंदाजीत कुणाला धमक दाखवता आली नाही. हार्दिकने २३ चेंडूत फक्त १८ धावा केल्या. परिणामी मुंबई इंडियन्सचा संघ निर्धारित २० षटकात सात विकेट्सच्या मोबदल्यात फक्त १५९ धावांपर्यंत मजल मारू शकला. चेन्नईकडून अंशुल कंबोज याने सर्वाधिक तीन, नूर अहमद दोन, तर रामकृष्ण घोष आणि जेमी ओवर्टन यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

१६० धावांचा बचाव करताना यंदाच्या हंगामात विकेटसाठी संघर्ष करत असलेल्या जसप्रीत बुमराहने आपल्या पहिल्याच षटकात संजू सॅमसनला माघारी धाडत मुंबईला चांगली सुरुवात करून दिली. अल्लाह गझनफर याने उर्विल पटेलच्या रूपात सीएसकेला दुसरा धक्का दिला, पण त्यानंतर कर्णधार ऋतुराज गायकवाड आणि आयपीएलमधील सर्वात महागडा अनकॅप्ड खेळाडू कार्तिक शर्मा जोडी जमली. ऋतुराजने ४८ चेंडूत नाबाद ६७ धावांची खेळी साकारली. दुसऱ्या बाजूला कार्तिकने पदार्पणाच्या हंगामातील सहाव्या सामन्यात ४० चेंडूत नाबाद ५४ धावांची खेळी साकारली. त्याचे आयपीएमधील हे पहिले अर्धशतक ठरले.

### अखिल भारतीय पुरुष व्यावसायिक गट कबड्डी स्पर्धा

# भारतीय नौदलाने बंड्या मारूती अमृत महोत्सवी चषक पटकाविला




**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय नौदलाने बंड्या मारूती सेवा मंडळाने आयोजित केलेल्या अखिल भारतीय पुरुष व्यवसायिक कबड्डी स्पर्धेचे विजेतेपद पटकविले. नौदलाचा भरत हुडा स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरला.

बंड्या मारूती संघाने आपल्या अमृत महोत्सवी वर्ष आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून या स्पर्धेचे आयोजन केले होते. स्पर्धेचे सह-प्रायोजक होते लाईफ इन्शुरन्स ऑफ इंडिया, तर ऑफिशियल पार्टनर होते बँक ऑफ इंडिया.

मुंबईतील ना.म. जोशी मार्ग येथील श्रमिक जिमखाना येथे मॅटवर झालेल्या अंतिम सामन्यात भारतीय नौदलाने युपी योद्धाचा प्रतिकार ४६-२७ असा सहज मोडून काढत रोख पाच लाख व चषक आपल्या नावे केला. उपविजेत्या युपीला चषक व तीन लाख रुपयांवर समाधान मानावे लागले. दोन्ही संघानी सावध सुरुवात केली. त्यामुळे पहिली चार-पाच मिनिटे सावध खेळ केल्यानंतर नौदलाने आपला खेळ

### भरत हुडा ठरला सर्वोत्तम खेळाडू

गतिमान करीत पहिला लोण देत १६-१० अशी आघाडी घेतली. लोण घेतल्यानंतर योद्धाच्या गगन गौडाने तुफानी चढाई करीत तीन गडी टिपत सामन्यात चुरस निर्माण केली, पण नौदालाने पूर्वार्धात आणखी एक लोण देत आणला. विश्रांतीला २७-१८ अशी आघाडी नौदलाकडे होती. उत्तरार्धात शिलकी गड्याची पकड करीत दुसरा लोण देत आपली आघाडी ३०-१८ अशी केली. त्यानंतर झटपट तिसरा लोण देत ४१-२३ अशी आघाडी वाढविली. येथेच युपीने आपली हार मान्य केली. युपीला एकही लोण देता आला नाही. नौदलाच्या या विजयात भरत हुडाने चढाईत १५, तर रोहित तोमरने ११ गुण घेत सर्वोत्तम कामगिरी केली. त्याला नितेशने चार, तर रिंकूने तीन पकडी करीत उत्तम साथ दिली. युपीकडून मनूने चढाईत १०, तर गगन गौडाने आठ गुण घेत प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला, मात्र त्याचा बचाव अगदीच दुबळा ठरला.

या अगोदर झालेल्या उपांत्य सामन्यात भारतीय नौदलाने युवा पलटन (इंशोअरकोट प्रा. लि.)चा ५६-४२ असा, तर युपी योद्धाने युनियन बँकेला ४६-२५ असे पराभूत करीत अंतिम फेरीत धडक दिली होती. उपांत्य उपविजयी दोन्ही संघाना प्रत्येकी चषक व रोख एक लाख देऊन सन्मानित करण्यात आले.

स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू नौदलाचा भरत हुडा याला एक लाख देऊन गौरविण्यात आले. युपी योद्धाचे गगन गौडा आणि सचिन यांना स्पर्धेतील उत्कृष्ट चढाई आणि पकडीचे खेळाडू ठरले. त्या दोघांना प्रत्येकी ५० हजार रुपये देण्यात आले.


या स्पर्धेत महाराष्ट्रातील संघांनी ठसा उमटविला. युनियन बँक, युवा पलटन यांनी तोडीस तोड खेळ केला, पण अनुभव व ताकद कमी पडल्याने अपयश आले. त्यात युनियन बँकेचे खेळाडू अगदी नवखे होते. ते सर्व महाराष्ट्रातील होते. प्रशिक्षक प्रशांत सुर्वे यांनी त्यांच्याकडून सर्वोत्तम कामगिरी करून घेतली. युवाच्या संग्राम मांजरेकरचेही कौतुक करावे लागेल.

# हा हंगामच आमचा नाही -हार्दिक पांड्या

**मुंबई : प्रतिनिधी**

चेन्नईतील चेपॉकच्या मैदानात हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखालील मुंबई इंडियन्सच्या संघाच्या पदरी यंदाच्या हंगामातील सातव्या पराभवाची नामुष्की ओढावली. या पराभवासह मुंबईचे स्वबळावर प्लेऑफचे तिकीट मिळवण्याचे स्वप्न भंगले आहे. चेन्नई सुपर किंग्सविरुद्धच्या पराभवानंतर त्यांनी तिन्ही क्षेत्रात सर्वोत्तम कामगिरी केल्याच सांगत कर्णधार हार्दिकने हा हंगामच आमचा नाही, असे म्हणून मोकळा झाला.

मुंबई इंडियन्सच्या संघाने १३ वर्षांनी यंदाच्या हंगामात विजयासह मोहिमेची सुरुवात केली होती, मात्र त्यानंतर



नऊ सामन्यात फक्त त्यांनी फक्त दोन सामने जिंकले. त्यामुळे मुंबई जवळपास प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडली आहे. हार्दिक पांड्याने पॅकअप झाल्याचे मान्य करत आघाडीच्या चारमध्ये पोहचणे मुश्किल असल्याचे मान्य केले.

सामन्यानंतर हार्दिक म्हणाला की, मला वाटत नाही की, हा आमचा हंगाम आहे. त्यांनी आमच्यापेक्षा चांगला खेळ केला. गोलंदाजी, फलंदाजी आणि क्षेत्ररक्षण सर्वत क्षेत्रात ते आमच्यापेक्षा सरस ठरले. एक वेळ अशी होती की, आम्ही १८० ते १९० धावांपर्यंत पोहचू, असे वाटत होते, पण १० षटकांनंतर आम्ही लय टिकवू शकलो नाही. आम्ही सामना योग्य प्रकारे संपवू शकलो नाही."

तो पुढे म्हणाला की, डावाच्या सुरुवातीला मोठे फटके खेळणे सोपे नव्हते. त्यांनी विचारपूर्वक खेळी केली. जिथे धावगती वाढवायची होती तिथे आमचे फलंदाज कमी पडले, कारण चेन्नईच्या गोलंदाजांनी चांगली कामगिरी केली. त्यांना बाद करण्यासाठी आम्हाला सर्वोत्तम गोलंदाजी करायची होती. आम्ही सर्व पर्याय वापरले, पण ते आमच्यापेक्षा सरस ठरले.

# अर्जुन तेंडुलकर टी-२० मुंबई लीगमध्ये खेळणार

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचा माजी फलंदाज सचिन तेंडुलकरचा मुलगा अर्जुन सध्या आयपीएल २०२६ स्पर्धेत लखनऊ सुपर जायंट्स संघाचा भाग आहे. गेल्या काही हंगामात तो मुंबई इंडियन्स संघाचा भाग होता. या हंगामात त्याला लखनऊ संघाकडून एकही सामना खेळण्याची संधी मिळालेली नाही. आयपीएलमध्ये एकही सामना खेळण्याची संधी न मिळालेल्या अर्जुनवर टी-२० मुंबई लीग स्पर्धेत मोठी बोली लागली आहे.

येत्या काही दिवसांत टी-२० मुंबई लीग स्पर्धेला सुरुवात होणार आहे. या हंगामासाठीचा लिलाव सोहळा शनिवारी पार पडला. या लिलावासाठी अर्जुन तेंडुलकरनेदेखील नाव नोंदवले होते. त्याची बेस प्राईज दोन लाख रुपये इतकी होती. त्याला आपल्या संघात घेण्यासाठी फ्रँचायझींमध्ये चांगलीच स्पर्धा रंगली. आर्क्स अंधेरी संघाने त्याच्यावर १० लाखांची बोली लावून आपल्या संघात स्थान दिले आहे. अर्जुन पहिल्यांदाच या स्पर्धेत खेळताना दिसून येणार आहे.

अर्जुन आधी मुंबई क्रिकेट असोसिएशनचा भाग होता. २०२२-२३पासून तो देशांतर्गत क्रिकेटमध्ये गोवा संघाचा भाग आहे, पण त्याला ही स्पर्धा खेळण्यासाठी विशेष अनुमती देण्यात आली आहे. अशीच सूट सिद्धात अधतराव यालादेखील देण्यात आली आहे.

# नाशिकचा रामकृष्ण ‘सीएसके’कडून चमकला!

**नाशिक : प्रतिनिधी**

मुंबई इंडियन्सविरूद्धच्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जकडून खेळणारा नाशिक येथील २८ वर्षीय रामकृष्ण घोषला संधी देण्यात आली. या संधीचे त्याने सोने केले.

नाशिकमध्ये जन्मलेला रामकृष्ण घोष देशांतर्गत क्रिकेटमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करतो. आपल्या अष्टपैलू कामगिरीने त्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. मध्यमगती गोलंदाजीसाठी ओळखला जाणारा आणि फलंदाजीत हातभार लावणाऱ्या रामकृष्णला चेन्नईने आयपीएल २०२५ स्पर्धेसाठी झालेल्या लिलावात ३० लाखांची बोली लावून आपल्या संघात स्थान दिले होते. त्याला पदार्पणाची संधी



दिली गेली नव्हती, पण त्याची गोलंदाजी पाहून त्याला चेन्नईने आयपीएल २०२६ स्पर्धेसाठी रिटेन केले. या हंगामातील दुसऱ्या टप्प्यात त्याला पदार्पण करण्याची संधी मिळाली.

मुंबईविरूद्ध खेळताना त्याने सुरुवातीलाच विल जॅक्सला बाद करण्यासाठी भन्नाट कॅच घेतला. त्यानंतर त्याने २१ धावांवर फलंदाजी करत असलेल्या सूर्यकुमार यादवला झेलबाद करत माघारी धाडले.

रामकृष्ण हा मध्यमवर्गीय कुटुंबातील मुलगा आहे, ज्याला महाराष्ट्राच्या वरिष्ठ संघात स्थान मिळवण्यासाठी प्रचंड मेहनत करावी लागली. महाराष्ट्र प्रीमियर लीग स्पर्धेत तो चमकला. त्याने विजय हजारे ट्रॉफीत हिमाचल प्रदेश संघाविरूद्ध एका डावात ४२ धावांत सात गडी बाद केले होते.

# अनकॅप्ड कार्तिक शर्माचे शानदार अर्धशतक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

चेन्नई सुपर किंग्सच्या संघाने आयपीएलच्या मिनी लिलावात ज्या अनकॅप्ड भारतीय खेळाडूवर इतिहासातील सर्वात मोठी बोली लावली, त्याच्या बॅटमधून मुंबई इंडियन्सविरुद्धच्या सामन्यात आयपीएलमधील पहिले अर्धशतक आले. कार्तिक शर्माने चौकार मारत संघाचा विजयही निश्चित केला. त्यानंतर बॅटला बंदूक करत ‘गन सेलिब्रेशन’सह मॅच विनिंग खेळीचा आनंद व्यक्त केला.

आयपीएलच्या मिनी लिलावात चेन्नई सुपर किंग्सच्या संघाने कार्तिक शर्मासाठी १४.२० कोटी एवढी मोठी रक्कम मोजली होती. त्याच्यासह प्रशांत वीरलाही एवढ्याच रकमेसह चेन्नईने आपल्या ताफ्यात सहभागी करून घेतले होते. विशेष म्हणजे मुंबई



इंडियन्सविरुद्धच्या चेपॉकच्या मैदानातील सामन्यात पहिल्यांदाच दोघांनाही संधी मिळाली.

कार्तिक शर्मा पाच सामन्यात तो धावांसाठी संघर्ष करताना दिसला, पण सहाव्या सामन्यात नाबाद अर्धशतकासह त्याने आयुष म्हात्रेची उणीव भरून काढण्यासाठी अन्य कोणाकडे पाहण्याची गरज नाही, अशी हमी देणारी खेळी केली. सोशल मीडियावर त्याच्या सेलिब्रेशनची तुफान चर्चा रंगताना दिसत आहे.




# डगआउटमधून रोहित शर्माची ‘कॅप्टन्सी’ झलक



**मुंबई : प्रतिनिधी**

चेन्नईच्या चेपॉकच्या मैदानातील चेन्नई सुपर किंग्सविरुद्धच्या लढतीत मुंबई इंडियन्सचा पराभव झाला. अल्प धावसंख्येचा बचाव करताना मुंबईची गोलंदाजी पाहून डगआउटमध्ये बसलेला रोहित शर्मा भडकल्याचे पहायला मिळाले.

धावांचा बचाव करताना जसप्रीत बुमराहने चेन्नईच्या दुसऱ्या आणि आपल्या पहिल्या षटकात संजू सॅमसनची विकेट घेत मुंबईला चांगली सुरुवात करून दिली. पॉवर प्लेमधील पाचव्या षटकात हार्दिक पांड्याने क्रिश भगत याच्या हाती चेंडू सोपवला. उर्विल पटेल याने त्याचे षटकाराने स्वागत केले. दुसऱ्या चेंडूवर त्याला चौकार बसला. त्याचे हे षटक पाहून डगआउटमध्ये रोहित शर्मा भडकला. एवढेच नव्हे तर डगआउटमधूनच त्याने ‘कॅप्टन्सी’ची झलक दाखवून देत युवा गोलंदाजाला गती परिवर्तन करून हळूवार चेंडू टाकण्याचा सल्ला दिला, जो कामी आला.

# मुंबई संघात हार्दिकला कुणाचाच सपोर्ट नाही

## माजी क्रिकेटपटूचा खळबळजनक दावा

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२६च्या गुणतालिकेत नवव्या स्थानावर असलेल्या मुंबई इंडियन्सचा आणि कर्णधार हार्दिक पंड्याचा संघर्ष थांबण्याचे नाव घेत नाहीये. संघाच्या या खराब कामगिरीचे खापर प्रामुख्याने हार्दिकवर फोडले जात असताना, माजी भारतीय क्रिकेटपटू मनोज तिवारी याने मात्र हार्दिकची पाठराखण केली आहे. हार्दिकला संघातून अपेक्षित पाठिंबा मिळत नसल्याचे तिवारीने म्हटले आहे.

चेन्नई सुपर किंग्सविरुद्ध शनिवारी झालेल्या सातव्या पराभवानंतर हार्दिकवर टीकेची झोड उठली. ‘क्रिकबझ’शी तिवारी म्हणाला की, यंदाच्या आयपीएल हंगामातील मुंबई इंडियन्सचा प्रवास आता संपला आहे. मैदानावर जे दिसतेय त्याबद्दल मी उघडपणे बोलतो. हार्दिकच्या पाठीशी कुणीही उभे नाही असे मला वाटते. एका कर्णधार म्हणून अपेक्षित पाठिंबा त्याला मिळताना दिसत नाही.

हार्दिकची वैयक्तिक कामगिरी चांगली होत नाहीये हे मान्य, पण बाकीच्या खेळाडूंनीही जबाबदारी घ्यायला हवी. सूर्यकुमार यादव सातत्याने धावा करत नाहीये, तिलक वर्माने एका सामन्यानंतर लय गमावली. अशा कामगिरीच्या जोरावर तुम्ही निकाल कसा मिळवणार, असे तिवारी म्हणाला.

### संघाकडे रणनीतीचा अभाव

कागदावर मुंबई इंडियन्स हा सर्वात ताकदवान संघ मानला जातो. रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव, हार्दिक पांड्या आणि जसप्रीत बुमराह यांसारखे दिग्गज कर्णधार या संघात आहेत. असे असूनही रणनीतीच्या बाबतीत हा संघ पूर्णपणे विखुरलेला दिसला. संकटाच्या वेळी या संघाकडे कोणताही ‘प्लॅन-बी’ तयार नसल्याचे या मोसमात वारंवार दिसून आले आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com